शनिवार, ०७ जानेवारी २०२३
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१४०
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • SATURDAY 07 JANUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-140 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

चर्चेतली बातमी

## संजय राऊतांची तडकाफडकी हजेरी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवडी महानगर दंडाधिकारी कोर्टाने संजय राऊतांविरोधात बाजवलेले अजामीनपात्र वॉरंट राऊतांनी तातडीने दुपारीच कोर्टापुढे हजेरी लावत रद्द करून घेतले आहे. अब्रुनुकसानीच्या दाव्यावरील सुनावणीला वारंवार अनुपस्थित राहिल्याने अखेर न्यायालयाने तक्रारदाराच्या विनंतीवरून ही कारवाई केली होती. भाजप नेते किरीट सोमय्यांच्या पत्नी मेधा सोमय्या यांच्याविरोधात राऊतांविरोधात दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्याची सुनावणी शिवडी कोर्टात सुरू आहे. राऊतांनी केलेले 100 कोटींच्या कथित शौचालय घोटाळ्यातील आरोप हे बिनबुडाचे आणि बदनामीकारक असल्याने आपली प्रचंड मानहानी झाल्याची तक्रार मेधा सोमय्या यांनी कोर्टात केली आहे. किरीट आणि त्यांच्या पत्नी मेधा सोमय्या यांनी 100 कोटींचा सार्वजनिक शौचालय घोटाळा केल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला होता. त्याविरोधात मेधा सोमय्यांनी राऊत यांच्याविरोधात मानहानीचा दावा दाखल केला आहे. त्यावरील शुक्रवारच्या सुनावणी दरम्यान संजय राऊत वारंवार अनुपस्थित राहिल्यानं दंडाधिकारी पी. आय. मोकाशी यांनी राऊतांविरोधात अजामीनपात्र वॉरंट बजावले होते. या सुनावणीत न्यायालयाने मेधा सोमय्यांचा जबाब नोंदवून घेतला आणि खटल्याची पुढील सुनावणी 24 जानेवारी रोजी निश्चित केली आहे.

# राम मंदिर अल कायदाच्या हिट लिस्टवर ?

## 'मस्जीद वही बनायेंगे' म्हणत दिली धमकी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी नुकतीच एक घोषणा केली आहे. 1 जानेवारी 2024 रोजी अयोध्येतले राम मंदिर दर्शनासाठी खुले केले जाईल, अशी ही घोषणा आहे. या पार्श्वभूमीवर दहशतवादी संघटना सक्रिय झाल्याचे चित्र आहे. आंतरराष्ट्रीय जिहादी गटाने राम मंदिर पाडून त्या जागी मशीद बांधण्याची प्रतिज्ञा घेतली आहे.**



गझवा-ए-हिंद या नियतकालिकाच्या ताज्या अंकात याबाबत माहिती प्रकाशित झाली आहे. याशिवाय जिहादी फीडच्या वतीने या आठवड्यात प्रसिद्ध केलेल्या ऑनलाइन मासिकामध्येही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याविरोधात भूमिका घेतली आहे. भारतीय मुस्लिमांनी जिहादला पाठिंबा द्यावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

एका 'टीव्ही वृत्तवाहिनीने याबाबतचे वृत्त प्रसिद्ध केले आहे. माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, 110 पानांच्या संपादकीय लेखामध्ये म्हटलं आहे की, 'बाबरी मशिदीच्या जागेवर राम मंदिर बांधलं जात आहे. ते लवकरच पाडलं जाईल आणि मूर्तीऐवजी अल्लाहची बाबरी मशीद बांधली जाईल. यासाठी त्यागाची गरज आहे.' तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, संपादकीय लेखातला मजकूर भारतीय वातावरणाशी परिचित असलेल्या व्यक्तीने लिहिलेला वाटतो. अल कायदाने भारतीय मुस्लिमांना उद्देशून म्हटले आहे, की त्यांनी भौतिक नुकसानाला घाबरू नये. कारण त्यांनी आधीच अनेक दशकांपासून जीवित आणि वित्त हानीचं नुकसान सोसलेलं आहे. हे मनुष्यबळ आणि संपत्ती जिहादसाठी वापरली असती तर एवढी हानी झाली नसती. भारतातली धर्मनिरपेक्षता ही भारतीय मुस्लिमांसाठी 'नरक' आहे, असे दहशतवादी संघटनेने म्हटले आहे. हिंदू-मुस्लिम बंधुत्वाच्या घोषणा ही निव्वळ फसवणूक असल्याचेही या लेखात म्हटले आहे. या लेखात सांगण्यात आलं आहे की, 'ही सर्व फक्त माहिती नाही. बाबरी मशीद 30 वर्षांपूर्वी पाडण्यात आली होती. 20 वर्षांपूर्वी गुजरातमध्ये अहमदाबादेत गर्भवती महिलांना जाळण्यात आले. आज सर्वत्र बुलडोझर चालवले जात आहेत. जामिया मिलिया (इस्लामिया), अलीगढ, जामिया उस्मानिया (हैदराबाद उपनगर) आणि देवबंदमधल्या (शहर) प्रत्येक मुस्लिमाविरुद्ध हिंदू आपले चाकू, भाले आणि तलवारी धारदार करत आहेत.

# पाण्याचे मूल्य समजून शाश्वततेकडे वाटचाल आवश्यक!

## 'वॉटर व्हिजन-2047' मध्ये देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**भोपाळ :** पाणी हे निसर्गाने आपल्याला मुक्तहस्ते दिले असले तरी त्याचे मूल्य खूप मोठे आहे. ते मूल्य ओळखूनच जलशाश्वततेकडे आपल्याला वाटचाल करावी लागेल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले. जलसंरक्षणाचे सामूहिक प्रयत्न म्हणून केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या वतीने कुशाभाऊ ठाकरे आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटर, भोपाळ येथे आयोजित 2 दिवसीय संमेलनात ते बोलत होते. यातील 'वॉटर गव्हर्नन्स' या विषयावरील एका सत्राच्या अध्यक्षस्थानी ते होते. केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंग शेखावत, प्रल्हादसिंग पटेल आणि विविध राज्यांचे जलसंपदा मंत्री या परिषदेला उपस्थित होते. काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या परिषदेचे व्हीडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून संबोधन करीत उदघाटन केले होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पाणी निसर्गाने दिले असले तरी त्याचे आर्थिक मूल्य आहे. ते मूल्य समजून जल व्यवस्थापन समजून घेत शाश्वततेकडे वाटचाल करणे ही आज काळाची गरज आहे. भविष्यातील पिढ्यांना



जलसंसाधन उपयोगी पडेल, याचे भान ठेवूनच ते वापरले पाहिजे. यासाठी एकात्मिक विचार आणि जनसहभाग या दोन बाबी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. जलशक्ती मंत्रालयाचा हा पुढाकार अतिशय चांगला आहे. यातून प्रत्येक राज्यांच्या योजना, कार्यक्रम, अभिनव प्रयोग सर्वांसोबत सांगण्याची संधी प्राप्त झाली आहे.

या परिषदेत महाराष्ट्राच्या वतीने त्यांनी एक सादरीकरण सुद्धा केले. त्यात जलयुक्त शिवारची यशोगाथा, पुराचे पाणी दुष्काळी भागात वळविणे, एकात्मिक जल आराखडा अशा विविध बाबींची माहिती दिली. राज्याने स्वतःचे असे एक जलधोरण 2019 मध्ये तयार केले असून, पाण्याच्या प्रक्रिया आणि पुनर्वापरावर मोठा भर राज्यात देण्यात येत आहे. नागपुरात महानगरपालिकेद्वारे प्रक्रिया पाणी वीज प्रकल्पाला देण्याचा प्रयोग आणि त्यातून महापालिकेला मिळत असलेले उत्पन्न याचा दाखलाही त्यांनी दिला. औष्णिक वीजनिर्मितीसाठी प्रक्रिया केलेले पाणी किंवा पुनर्वापरातील पाणी उपयोगात आणले जाणार आहे. 2030 पर्यंत औद्योगिक वापरासाठी लागणाऱ्या पाण्याची मोठी बचत आम्ही करणार आहोत, असेही ते म्हणाले. महाराष्ट्रात एकात्मिक जलआराखड्यानुसारच नवीन प्रकल्पांना मान्यता प्रदान केली जाते. त्यामुळे फार राजकीय हस्तक्षेपाला स्थान राहत नाही. पाण्याची गळती रोखण्यासाठी 100 टक्के वितरण व्यवस्था ही पाईपलाईनच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. जलनियमन प्राधीकरणाच्या माध्यमातून निर्माण झालेली भक्कम व्यवस्था इत्यादींबाबतही त्यांनी आपल्या भाषणातून प्रकाश टाकला.

# चित्रा वाघ यांना महिला आयोगाची नोटीस

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अभिनेत्री उर्फी जावेद आणि चित्रा वाघ यांच्यातील वाद गेल्या



काही दिवसांपासून चर्चेत आहे. उर्फी जावेद परिधान करत असलेल्या तोकड्या कपड्यांवरून तिच्यावर कारवाई करण्याची मागणी चित्रा वाघ यांनी केली आहे. याप्रकरणी काल त्यांनी पत्रकार परिषद घेत महिला आयोगावरही टीकास्त्र सोडले. महिला आयोगाने अनुराधा वेबसिरीजच्या पोस्टरवरून तेजस्विनी पंडितला नोटीस पाठवली. मात्र, उर्फीला जाणीवपूर्वक नोटीस पाठवत नसल्याचा आरोप त्यांनी केला होता. या आरोपाबाबत आता राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी स्पष्टीकरण दिले आहे. तसेच याप्रकरणी चित्रा वाघ यांना नोटीस पाठवली असल्याचेही त्या म्हणाल्या. अनुराधा बेवसिरीजच्या पोस्टरवरून राज्य महिला आयोगाने तेजस्विनी पंडीतला कोणतीही नोटीस पाठवली नाही. याबाबत आम्ही अनुराधा वेबसिरीजचे दिग्दर्शक संजय जाधव यांना नोटीस पाठवली होती. आम्हाला मिळालेल्या तक्रारीच्या आधारे ही नोटीस पाठवली असून दिग्दर्शक म्हणून तुमची भूमिका स्पष्ट करावी, असे निर्देश या नोटीसद्वारे देण्यात आले होते. त्यानंतर संजय जाधव यांनी आयोगाला त्यासंबंधित उत्तर दिले. मात्र, यादरम्यान कुठेही तेजस्विनी पंडितचा उल्लेख नव्हता, असे स्पष्टीकरण रुपाली चाकणकर यांनी दिले.

# समृद्धी महामार्गावर वन्यप्राण्यांचा जातोय जीव


## सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर : वाहतुकीस बंदी असताना दुचाकीस्वारही सुसाट

आधुनिक केसरी न्यूज


गुलाब वाघ

गंगापूर : माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट् असलेला समृद्धी महामार्ग वाहतुकीस खुला करण्यात आला आहे. मात्र या समृद्धी महामार्गावर दुचाकीस्वारांना वाहतुकीस पूर्णपणे बंदी असूनही सध्या दुचाकीस्वार मात्र सुसाट वेगाने समृद्धी महामार्गांवर धावत आहेत. विशेष म्हणजे समृद्धीवर असणारे सुरक्षारक्षक यांच्यावर मात्र प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. कारण त्यांच्यादेखत दुचाकीस्वार धावत आहेत, मग दुचाकीस्वार समृद्धीवर कुठून प्रवेश करतात हाही प्रश्न आहे. मात्र दुचाकी चालकांवर दुर्घटना घडल्यावर कारवाई करणार का? असा प्रश्न निर्माण होत आहे. दरम्यान आत्तापर्यंत समृद्धीच्या बाजूला सुरुक्षाभिंतीचे काम अपूर्ण असल्याने आत्तापर्यंत वाहनांच्या धडकेत हरीण, काळवीट मरण पावले आहेत. तसेच कुत्रे व इतर पाळीवप्राणीही समृद्धी महामार्गांवर मोकाट फिरत असल्याने अनेक अपघात घडत आहेत. त्यामुळे समृद्धी महामार्गावर सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. समृद्धीवर नियंत्रण असलेला एम.आर.डी.सी.चे अधिकारी मात्र या बाबींकडे सोयीस्करपणे कानाडोळा करत आहेत.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


## खाणाऱ्याने खात जावे ...

आधुनिक केसरी

अनिल अवचट यांचं ' छंदाविषयी ' हे पुस्तक नुकतंच वाचनात आलं होतं. अनिल अवचट म्हणजे जीवनाच्या वेगवेगळ्या प्रांतात मुशाफिरी करणारा अवलिया. त्याची साक्ष हे त्यांचं पुस्तक देतं . छंद माणसाला काय देतात त्याचं उत्तर या पुस्तकात आपल्याला वाचायला मिळतं. चित्रकला, शिल्पकला, पाककला, ओरिगामी , बासरी, वाचन आणखी कितीतरी छंदांविषयी हे पुस्तक आपल्याशी बोलतं. गरजेपुरता थोडाफार स्वयंपाक येत असलेल्या अनिल अवचटांनी निरनिराळ्या व्यक्तींकडून निरनिराळे पदार्थ कसे बनवायचे हे शिकून घेतले. नुसतेच शिकले नाहीत तर ते बनवून दुसऱ्यांना आनंदाने खाऊ घातले. अगदी दही लावण्यापासून तर विविध प्रकारची लोणची, चविष्ट चिवडा बनवणे आदी कौशल्ये त्यांनी हस्तगत केली. त्याच्यात त्यांची अगदी खासियत निर्माण झाली. मग अगदी त्यांच्या मुलीसुद्धा त्यांच्या हातच्या पदार्थांची मागणी करू



लागल्या. अगदी मित्रमंडळी सुद्धा त्यांच्या हातचे पदार्थ खाण्यासाठी हक्काने त्यांच्याकडे येऊ लागले. आपल्याकडे काही काही क्षेत्रे आपण स्त्रियांची ठरवून टाकली आहेत. त्यातील स्वयंपाक हे एक. लेबल लावण्यात आपण फार पटाईत. एकदा हे काम स्त्रियांचे असे ठरवले की आपण मोकळे. पण अनिल अवचटांसारखी माणसे या कल्पना मोडीत काढतात. तुम्हाला शिकायची इच्छा असली की काहीही शिकता येतं. अवचटांनी तर बाजारातून भाजी आणताना भाजी कोणती आणि कशी घ्यावी, आणल्यावर ती कशी निवडावी, चिरावी या सगळ्या गोष्टी आनंदाने आणि मनापासून शिकून घेतल्या. स्वयंपाक करताना ज्या वस्तू लागणार आहेत, त्या जर उत्तम दर्जाच्या असल्या तर तर स्वयंपाकही चांगला बनतो. खरं तर स्वयंपाक करणं ही गोष्ट जेवढी कला आहे तेवढीच ती शास्त्र पण आहे ! ज्यांनी ज्यांनी ती शिकून घेतली त्यांचा फायदाच झाला. कोरोना काळात काहींच्या नोकऱ्या गेल्या. अशा कठीण परिस्थितीत ज्यांना उत्तम पाककला येत होती, त्यांना त्या कलेने हात दिला. त्यांना एक उत्पन्नाचे साधन मिळाले. **क्रमश :**



## आनंदी पहाट

## आपले शिक्षणच विलक्षण क्षण निर्माण करते

आधुनिक केसरी

असं म्हंटलं जातं कि आपल्या प्रत्येकाची दोन मनं कार्यरत असतात. एक अंतर्मन कि जे सुप्त स्वरुपात कार्यरत असतं आणि दुसरं बाह्यमन, ज्याचं कार्य जाणीवपूर्वक सुरु असतं. काहीजणांना ध्यानीमनी धनाचे धनी व्हावं असंच वाटत असतं. मग ते धन कसं मिळालं ह्यापेक्षा देखील किती मिळालं ह्याचंच महत्व त्यांना अधिक वाटत असतं. धनी होण्याव्यतिरिक्त त्यांच्या काहीच ध्यानांत येत नसतं. स्वतःला सिद्ध करण्याची जिद्द असणे हे कमीपणाचे लक्षण असू शकते का? कि स्वतःला सिद्ध न करताच प्रसिद्ध होण्याचं महत्व अधिक असतं?



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

शिक्षणातील कोणताही क्षण विलक्षण न होता, शैक्षणिक यशप्राप्ती न मिळता देखील स्वतःला प्रकांड पंडित समजणाऱ्या व्यक्तीला आपल्यांत काही उणिवा असू शकतात ह्याची जाणीवच नसल्याचं दिसून येतं. अशिक्षित असणं हा निश्चितच गुन्हा नाही किंवा दोषही नाही. परंतू शिक्षणाचा गंधही नसलेल्या व्यक्तीच्या स्वतःच्या नावापुढे जेव्हा डॉ.ची उपाधी लावली जात असते, तेव्हा मात्र सिद्ध होतं कि पैशानं काहीही विकत घेता येऊ शकतं. स्वतः मेहनत घेऊन, इमानदारीनं शिक्षण घेऊन पी. एच. डी. मिळवून स्वतःला सिद्ध करणारे कदाचित फारसे प्रसिद्ध होत नसतील, परंतू त्यांना पी. एच. डी. मिळवण्यासाठी तथाकथित शिक्षण महर्षींनी मांडलेल्या शिक्षणाच्या बाजारांत कोणताही सौदा झालेला नसतो, हे अधिक महत्वाचं. डी. लिट. / डॉक्टरेट मिळवणं म्हणजे भाजी मंडईतून मिरच्या- कोथिंबीर आणण्यासारखं आहे का? शिक्षणाची अशी दैना ह्या शिक्षणाधिपतींनी केल्याची आपल्याला खरंच जाणीव होत नाही का? शिक्षणाचा बाजार मांडलेल्या ह्या प्रकांड पंडितांना त्यांच्या कुकर्माची जाणीव आपण करून द्यायला नकोय का? खिरापत वाटल्यासारख्या पदव्या वाटणाऱ्या तथाकथित शिक्षण महर्षींना त्यांच्यातील उणिवा दाखवून द्यायला नकोयत का?



आधुनिक केसरी

**थकली रे काया | संसारात ||**

**काय करू देवा | आणीक सायास**
**मिटली रे आस | देहाची ह्या ||१||**
**मना लागे ओढ | तुझ्या चरणाची ||**
**मज पामराची | काकुळती ||२||**
**क्षुधा-तृष्णा सारी | हरपून गेली ||**
**भ्रांत ना उरली | तुजवीन ||३||**
**चिंतनी चिंतन | क्षणोक्षणी चाले ||**
**संदेह निमाले | अंतरीचे ||४||**
**धाव धाव आता | धाव विठुराया ||**
**थकली रे काया | संसारात ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

**इतिहास घडविण्यासाठी इतिहास समजून घेऊन भूगोल बदलावा लागतो. पराक्रमाचा इतिहास याची साक्ष देण्यास पुरेसा आहे.**

**मातृत्व, पितृत्व या शब्दाप्रमाणेच मित्रत्व या शब्दाला पर्याय नसतो. एक मित्र देखील अनेक संकटांतून तारून नेतो; मग अनेक मित्र असतील, तर किती छान!**



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## स्वर्वेद

आधुनिक केसरी

**सत्य असत्य से अलग है, सो पर सत्य स्वरुप ।**
**अकथ अलौकिक तत्त्व है, अज अनादि वर रुप ।।०१।।**
**(स्वर्वेद प्रथम मण्डल प्रथम अध्याय) ०१/०१/०१**

मुळ भाष्याचा मराठी अनुवाद :

तो जगन्नियन्ता परमेश्वर प्रकृती, आत्मा, काल आदि नित्य पदार्थांमध्ये व्यापक असून तीन पाद शुद्ध सच्चिदानन्द स्वरूपाने प्रकाशित आहे. त्याचे वर्णन वाणी आणि इंद्रियांनी होऊ शकत नाही. तो अवाच्य परब्रह्म प्राकृतिक जड स्वरूपांपेक्षा वेगळा चेतन शुद्ध स्वरूपाने प्रकाशित आहे. त्याच्या समान दुसरा कुठलाही सजातीय पदार्थ नाही ज्याची त्याला उपमा देता येईल किंवा त्याच्याशी समानता होईल अशी कुठलीही विजातीय वस्तू नाही. त्याच्या व्यापकत्वामुळे तो स्वगत-भेद-शून्य-त्रिकालाबाधित-गुणातीत सर्वांचा स्वामी, सर्व नाम रूपांचा स्त्रष्टा, आधार स्तंभ आहे.



**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## द्वैतकल्पनानिरसन

आधुनिक केसरी


सुर्योदय झाला की अंधार नाहीसा होतो. सुर्याच्या प्रकाशापुढे अंधार टिकत नाही. त्याचप्रमाणे खरे शुद्धब्रम्ह असेल तर खोटेपणा टिकत नाही. ब्रम्हज्ञानाच्या प्रकाशाने खोटी कल्पना नाश पावते. कल्पनाच नाहीशी झाली की द्वैताचे भान व चिंतन आपोआप नाहीसें होतात. शुद्ध कल्पनेच्या बळावर अशुध्द कल्पना नाहिशी करता येते.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

मित्रांनो समर्थांचा मोलाचा सल्ला याठिकाणी सदैव लक्षात ठेवावा."कधीही खोटं वागु नये. नेहणी सत्याने वागावं आचरण शुध्द ठेवाव. शुध्द कल्पनेच्या अंगी स्थिरता असते म्हणजेच मन विचलित होत नाही. ती निर्गुण रूपात स्थिर रहाते. स्वस्वरूपाचे विस्मरण ती कधीही होऊ देत नाही. स्वस्वरूपाचे अखंड अतूट,अनुसंधान किंवा स्मरण हीच शुध्द कल्पनेची खुण समजावी. सतत स्वस्वरूपी लीन, द्वैत मय द्रुष्यांचे संपूर्ण विस्मरण आणि अद्वितीय ब्रम्हाचे साक्षात ज्ञान या तीन गोष्टी जेथे असतात तिथे शुध्दकल्पना कायमची वास करते. अद्वैतात रमणारी कल्पना शुध्द तर द्वैतात रमणारी कल्पना अशुद्ध असते. अद्वैतकल्पनेचा उदय झाला की द्वैत नाहीसे होते. शुध्द कल्पना अशुद्ध कल्पनेवर मात करते. ते स्वस्वरूप होय.स्वस्वरूपाशी कल्पना करू लागले की आपण तद्रुप होतो. त्यातचं आपण रममाण होऊ लागतो. ज्या प्रमाणे सुर्य अस्ताला जाऊ लागला म्हणजे अंधार पडू लागतो त्या प्रमाणे आत्मज्ञान मलीन झाले की अज्ञानाचा जोर वाढतो हे टाळण्यासाठी अखंड चांगले तेच श्रवण करावे.

## मनाचे श्लोक



आधुनिक केसरी

**मना गूज रे तूज हें प्राप्त जालें।**
**परी अंतरी पाहिजे येत्न केले।**
**सदा श्रवणें पाविजे निश्चयासी।**
**धरी सज्जनसंगती धन्य होसी।।२०२।।**

श्लोकार्थ : मना !! परमात्मदर्शनाचे हे रहस्य तुला मिळाले आहे. पण त्याचा अनुभव येण्यास तुला अंतर्यामी साधन केले पाहिजे. सतत श्रवण केल्याने आत्मबुद्धी उदय पावते, म्हणून संतांची संगती धर. तिने तू धन्य होशील.

विवेचन : सर्वत्र रामरुप दिसू लागले की द्वैत भाव नष्ट होतो. हीच जिवाशिवाची भेट असते असे समर्थांनी मागील श्लोकांत सांगितले. सदर श्लोकाच्या पहिल्या चरणात समर्थ म्हणतात की सर्वात गुप्त ( गूज ) असलेले ज्ञान मी तुम्हाला सांगितले आहे. श्रीमद्‌भगवद्‌गीतेत भगवंताने जे अर्जुनाला सांगितले तेच गूज समर्थांनी मनाच्या श्लोकांत आपल्याला सांगितले आहे.

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

महान साधू रमण महर्षी मनाच्या श्लोकांना तिजोरीतील मौल्यवान ऐवज म्हणतात ते याचसाठी. कोणताही श्लोक वाचावा, तसे आचरण करावे आणि त्याची तात्काळ अनुभूती घ्यावी. आजच्या आधुनिक *बोली भाषेत सांगायचे तर हे श्लोक म्हणजे परमार्थाचे अॅप आहे. * मनाचे श्लोक वेदांताचे सार आहेत असे म्हणता येईल. गीताई मध्ये विनोबाजी म्हणतात,

"अत्यंत गूढ हे शास्त्र निर्मळा
तुज बोलीलो | *
हे जाणे तो बुध्दीमंत होईल कृत-कृत्य चि||"

समर्थ म्हणतात की जरी मी तुम्हाला हे गुप्त ज्ञान दिले असले, तरी ते अंगी मुरवणे, त्याचा उपयोग समाजासाठी करणे या सर्व गोष्टी तुम्हालाच कराव्या लागतील. एखाद्या स्पर्धेत यश मिळवणे सोपे, परंतु ते यश सातत्याने टिकवणे अवघड असते. गुरू कितीही श्रेष्ठ असला तरी शिष्याची साधना शिष्यालाच करावी लागते, हे कायम ध्यानात ठेवायला हवे. सेविलेंचि सेवावें अन्न । घेतलेंचि घ्यावें जीवन । तैसें श्रवण मनन । केलेंचि करावें ॥" (दास.०७.०८.४७) {ज्याप्रमाणे वारंवार अन्नसेवन करावेच लागते, किंवा पाणी वरचेवर ध्यावेच लागते, त्याप्रमाणे श्रवण हे परमार्थास अत्यंत आवश्यक असल्याने श्रवण-मनन सोडूच नये.} नामस्मरण आणि श्रवण हे प्रमुख दोन मार्ग सर्व संतांनी साधकांना सांगितले आहेत. नवाविधा भक्तीमध्ये श्रवण ही पहिली भक्ती आहे. इंग्रजी भाषेत एका साधारण एकसारखा अर्थ असणारे दोन शब्द आहेत. एक आहे हेअर (hear म्हणजे ऐकणे आणि दुसरा आहे लिसन ( listen म्हणजे ऐकणेच पण पूर्ण लक्ष देऊन ). आपण गाणी ऐकतो म्हणजे hear करतो आणि वर्गात मात्र शिक्षक आपल्या please listen अस सांगतात. हाच दोन्हीतील मूलभूत फरक आहे. ऐकण्यासाठी आपल्याकडे श्रवण हा एक मार्मिक समानार्थी शब्द आहे. पण श्रवण करणे म्हणजे नुसते ऐकणे नव्हे तर ऐकल्याप्रमाणे कृती करणे. "जेथें नाहीं श्रवण मनन । तेथें कैंचें समाधान । मुक्तपणाचें बंधन । जडलें पायीं ॥ ४२ ॥ मुमुक्षु साधक अथवा सिद्ध । श्रवणेंविण तो बद्ध । श्रवणमननें शुद्ध । चित्तवृत्ति होय ॥ ४३ ॥" * {जेथे श्रवण, मनन नसते तेथे समाधान कसे टिकून राहणार ?' मी मुक्त झालो ' या अभिमानामुळे श्रवण, मनन केले नाही, तर मुक्तपणाच्या अभिमानामुळे तो बद्ध होतो. मुमुक्षू असो, साधक असो वा सिद्ध असो, श्रवण, मननाशिवाय तो अबद्धच जाणावा. श्रवण, मननानेच चित्तवृत्ती शुद्ध होते.} समर्थानी मागील 201 श्लोकात आपल्या परमात्म प्राप्तीचा सोपान म्हणजे मार्ग सुलभ करून सांगितला. जेंव्हा कोणताही वडीलधारा माणूस आपल्याला काही सांगतो तेंव्हा त्याप्रमाणे आपण कृती करावी, अशी त्यांची स्वाभाविक अपेक्षा असते. इथे तर साक्षात समर्थ आपल्याला भगवंताच्या प्राप्तीचा मार्ग स्वानुभव घेऊन सांगितला आहे. गंतव्य स्थानाचा मार्ग जरी कोणी आपल्याला सांगितला तरी प्रवास मात्र आपल्यालाच करायचा असतो. यामुळे सांगितलेल्या साधनांचा उपयोग करून आपल्या अंतर्यात्रेला सुरुवात केली पाहिजे. ही अंतर्यात्रा सुरळीत पार पडण्यासाठी संत्संगती अत्यंत महत्वाची ठरते असे सर्व संत सांगतात. सज्जनांच्या संगतीत रहावे असा आग्रह समर्थांनी मनाच्या अनेक श्लोकांत केलेला आढळतो.

## हरिपाठ

आधुनिक केसरी

पंढरपूरच्या पांडुरंग पुरुष देव असून त्याला सर्व संतांनी माऊली केले आणि सर्व संत सुद्धा त्या विठू माऊली प्रमाणे विश्वाची माऊली झाले.....! अखंड नामस्मरणाने अनेक शिष्यांनी संतत्व प्राप्त करून घेतले. परमार्थ आचरण करायला अत्यंत सुलभ आहे. एकतर समोरच्या मनुष्याला आई माना, पूर्ण जगाला आपली आई माना, अथवा संपूर्ण जगाची आई व्हा.

# पत्रकारांनी प्रसिद्ध केलेल्या बातम्यांवरच विधिमंडळात प्रश्न मांडून ते मार्गी लावले : आ. सतीश चव्हाण

## खुलताबादेत दर्पणदिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** खुलताबाद तालुक्यातील पत्रकारांनी तालुक्यातील प्रलंबित प्रश्न वर्तमानपत्रात मांडून जनतेचे लक्ष वेधून घेतले असून हेच प्रश्न विधीमंडळ सभागृहात मांडून ते मार्गी लावले असल्याचे प्रतिपादन आ. सतीश चव्हाण यांनी खुलताबाद येथे दर्पणदिन कार्यक्रमात आज शुक्रवारी केले. खुलताबाद तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने खुलताबाद शासकीय विश्रामगृहाच्या प्रांगणात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून आ. सतीश चव्हाण तर अध्यक्षस्थानी दै. दिव्य मराठीच्या निवासी संपादक तृप्ती राऊत या होत्या तर भालचंद्र पिंपळवाडकर, प्रभू गोरे, माजी नगराध्यक्ष अँड एस.एम.कमर, भद्रा मारूती संस्थानचे अध्यक्ष मिठ्ठू पा. बारगळ, डॉ. प्रा. गणी पटेल, विलास चव्हाण, जगन्नाथ खोसरे, देवीदास अधाने, मजहर पटेल, महेश उबाळे, प्रकाश वाकळे, प्रविण इंगळे, दिनेश अंभोरे, सतीश दांडेकर, ज्ञानेश्वर मातकर, ज्ञानेश्वर दुधारे, ऋषीकेश बोडखे, गजानन फुलारे, अब्दूल समद, आबेद जहागीरदार, साईनाथ जाधव, शाखा अभियंता नरेंद्र देशमुख, पत्रकार सुनील घोडके , रोशनी शिंपी आदींची प्रमुख उपस्थिती होती.
यावेळी आ. सतीश चव्हाण यांनी विकासकामात पत्रकारांचे मोठे योगदान असून आज शोधपत्रकारिता करण्याची गरज असल्याचे सांगितले. केवळ प्रेसनोट व कार्यक्रमाऐवजी पत्रकारांनी तळागाळातील लोकांचे प्रश्न मांडावे असे आवाहन आ.सतीश चव्हाण यांनी केले. यावेळी जेष्ठ पत्रकार तृप्ती राऊत व भालचंद्र पिंपळवाडकर यांनी मार्गदर्शन केले. सुत्रसंचालन प्रा. विष्णू सुरासे यांनी तर आभार देवदत्त कोठारे यांनी मानले. यावेळी पत्रकारितेत डॉक्टरेट मिळविणारे अश्विनी मोरे, सचिन बनसोडे, शेखर मगर यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



# कळसाला धडकून विमानाचा अपघात

आधुनिक केसरी न्यूज

**रीवा :** मध्य प्रदेशमधील रीवा येथे एक विमान दुर्घटना घडली असून यामध्ये एका पायलटचा मृत्यू झाला आहे, तर दुसरा पायलट जखमी असल्याची माहिती मिळत आहे. रीवाचे पोलीस अधिक्षक नवनीत भसीन यांनी या दुर्घटनेची माहिती देताना सांगितले की, रीवा जिल्यात प्रशिक्षणार्थी विमान मंदिराच्या कळसाला जाऊन धडकले आणि त्यात विमान दुर्घटना घडली. यात पायलट कॅप्टन विमल कुमार, वय ५४ यांचा मृत्यू झाला आहे. ते बिहारमधील पटना येथील रहिवासी होते. मिळालेल्या माहितीनुसार एका खासगी प्रशिक्षण कंपनीचे हे विमान मंदिराचा कळस आणि वीजेच्या तारा यांना धडकून अपघातग्रस्त झाले. ही घटना चौरहाटा ठाण्याजवळील उमरी गावातील मंदिरानजीक घडली. अपघात झाल्यानतंर एका पायलटचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा पायलट गंभीर जखमी असल्याचे कळते. जखमीस संजय गांधी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. हा अपघातात विमानाच्या पंखाचा चक्काचूर झाला, त्यावरुन या अपघाताची दाहकता समजून येते.



# मोदी सरकारने कामगारांचे अधिकार व हक्क संपुष्टात आणले : नाना पटोले

## उद्योगपती मित्रांचे १०.५० लाख कोटींचे कर्जमाफ

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देश स्वतंत्र झाल्यानंतर पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी देशाला प्रगतीच्या वाटेवर नेऊन उभे केले. काँग्रेसने कामगारांच्या मदतीने भारताला एक सक्षम देश म्हणून उभा केले. या कामगारांसाठी काँग्रेस सरकारने अनेक कायदे करुन हक्क व अधिकार दिले पण मोदी सरकारने कामगार चळवळीचे अस्तित्व संपवण्याचे काम केले असून मालकधार्जिणे कायदे आणून कामगार व्यवस्था, त्यांचे हक्क व अधिकार संपुष्टात आणले आहेत, अशी घणाघाती टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.
पनवेल येथील इंटकच्या राजस्तरीय अधिवेशनात नाना पटोले बोलत होते. ते पुढे म्हणाले की, २०१४ साली नरेंद्र मोदी यांनी भरमसाठ आश्वासने देत सत्ता मिळवली. दरवर्षी २ कोटी नोकरी देऊ, एक देश एक कर, १५ लाख रुपये प्रत्येकाच्या बँक खात्यात जमा करू, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करु, अशी प्रलोभने दिली व जनतेनेही भाजपाला बहुमताने सत्ता दिली. पण सत्तेत येताच मोदींनी प्रसार माध्यमांना ताब्यात घेतले व लोकशाहीचा चौथा स्तंभ संपवला, प्रशासकीय व्यवस्थेवर दबाव आणला, न्यायव्यवस्थेची वेगळी परिस्थिती नाही. तीन काळे कायदे आणून शेती व शेतकऱ्याला देशोधडीला लावण्याचा डाव आखला पण काँग्रेसने देशभर आवाज उठवला, शेतकऱ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला व शेवटी मोदी सरकारला काळे कायदे मागे घेण्यास भाग पाडले. कामगारांना विविध सवलती, हक्क व अधिकार देणारे कायदे होते त्यातही मोठ्या प्रमाणावर बदल करून मालकांचे हित साधणारे व कामगारांना उद्योगपतींचे गुलाम बनवणारे कायदे आणले. मोदी सरकार देशातील महत्वाचे सरकारी उपक्रम काही मोजक्या उद्योगपती मित्रांच्या घशात घालत आहेत. या खाजगीकरणामुळे कामगारांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. मोदी सरकारने त्यांच्या उद्योगपती मित्रांचे १०.५० लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केले आणि कामगारांच्या हिताकडे दुर्लक्ष केले.



# व्हाईस ऑफ मीडियाच्या सर्व पत्रकारांना दिली ॲक्वाची कॅन

## पत्रकार दिनी अशोक देशपांडे यांनी केला पत्रकाराचा सन्मान



आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**जळगाव जा :** जळगाव जामोद नगरीचे अशोक देशपांडे यांनी आज पत्रकार दिनी सर्व पत्रकारांचा पुष्पगुच्छ आणि ॲक्वाची कॅन सप्रेम भेट दिली. सुरवातीला दर्पनकार बाळशास्त्री जांभेकर याच्या प्रतिमेला गुलजारखा पठाण यांनी पुष्पहार अर्पन केला.त्यांतर जयदेव वानखडे,विजय पोहनकर यांनी पत्रकारदिनी विचार व्यक्त केले.

पत्रकार दिनाचे औचित्य साधत जळगाव जामोद येथील अशोक देशपांडे यांनी दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा पत्रकाराचा यथोचित सन्मान केला. अशोक देशपाडे हे शेतकरी आहे. शेतीवरच त्यांचा उदरनिर्वाह चालतो. वास्तविक या शेतकरी माणसाचे पत्रकारांसोबत काहिच संबध येत नसतांनाही देशपांडे याची नाळ पत्रकारांसोबत जूळलेली आहे. समाजातील इतरांनी त्याचा आदर्श घ्यावा असं हे व्यक्तीमत्व. या माणसाला भेटताच त्याच्या प्रेमाण पडाव. अतिशय प्रेमाने बोलणे. कुठलाही बडेजावपणा नाही. अतिशय शांत आणि प्रेमळ व्यक्तीमत्व...

पत्रकार दिनी दरवर्षी अशोक देशपांडे हे पत्रकारांना पुष्पगुच्छ कुठलीतरी वस्तू भेटीच्या स्वरूपात देत असतात.आज पत्रकार दिनी व्हाईस ऑफ मीडियाचे तालुका अध्यक्ष गुलाबराव इंगळे आणि त्याचे सहकारी यांचा आज यथोचित सन्मान केला व त्यांना पुष्पगुच्छ आणि ॲक्वाची कॅन सप्रेम भेट दिली. यावेळी जेष्ठ पत्रकार गुलजारखा पठाण, विजय पोहनकर, गुलाबराव इंगळे, जयदेव वानखडे, सागर झनके, अनिल भगत, आकाष उमाळे, राजेश बाठे, विनोद वानखडे,राहूल निर्मळ, योगेश म्हसाळ, मोहम्मद फारुख, संदिप भोपळे आदी पत्रकार हजर होते.

# पत्रकारितेने समाजाला दिशा देण्याचे काम केले

## भाजयुमो महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आपल्या लेखणीतून समाज जागृतीचे मौलिक कार्य करणारे, समाजाला आरसा दाखविणारे, प्रसंगी रोष पत्करून सत्य समोर आणण्याचे धाडस करणारे, लोकशाहीचा चौथा स्तंभ जीवंत ठेवण्यासाठी पत्रकार आणि पत्रकारितेचे मोठे योगदान असून पत्रकारिताने समाजाला दिशा देण्याचे काम केले आहे असा शब्दात भारतीय जनता युवा मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री राहुल लोणीकर यांनी पत्रकार बांधवांचा गौरव केला. मुंबई येथील भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात आयोजित दर्पण दिन व पत्रकार बांधवांच्या सत्कार समारंभ कार्यक्रम प्रसंगी श्री लोणीकर बोलत होते यावेळी माजी खासदार किरिट जी सोमय्या, भाजप महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ता केशव जी उपाध्ये यांची प्रमुख उपस्थिती होती पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण सुरू करून बाळशास्त्री जांभेकर यांनी तत्कालीन इंग्रज राजवटी विरोधात भारतातील जनसामान्यांची भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला होता आजही समाज भावना मांडण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून केले जात असून पत्रकारितेला समाज मनाचा आरसा वाटल्यास वावगे ठरणार नाही. अटल युवा पर्व अंतर्गत २५ डिसेंबर ते १२ जानेवारी या दरम्यान भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये २५ डिसेंबर रोजी स्वर्गीय अटलजी यांच्या जन्मदिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते संघटनात्मक ६२ जिल्ह्यांमध्ये सदरील वक्तृत्व स्पर्धा अत्यंत जोरदारपणे संपन्न झाली असून दिनांक पाच जानेवारी रोजी वसंत स्मृती भाजपा कार्यालय मुंबई येथे राज्यस्तरीय स्पर्धा संपन्न झाली त्यामध्ये प्रथम पारितोषिक रोहित खर्चवाल द्वितीय पारितोषिक नेहा पाटील तृतीय पारितोषिक प्रथमेश उंबरे यांनी पटकावले या तीनही स्पर्धकांना केंद्रीय पातळीवर आयोजित स्पर्धेमध्ये संधी दिली जाणार असल्याची माहिती देखील यावेळी लोणीकर यांनी दिली.

## ‘चांद्रयान-३’ सज्ज

आधुनिक केसरी

चांद्रयान- ३ मोहिमेचे काम जवळपास पूर्ण झाले असून ते प्रक्षेपणासाठी सज्ज आहे. येत्या जून-जुलै २०२३ मध्ये त्याचे प्रक्षेपण केले जाईल, अशी माहिती इस्रोचे अध्यक्ष डॉ. एस. सोमनाथ यांनी दिली. नागपुरात आयोजित इंडियन सायन्स कॉंग्रेसमध्ये ते बुधवारी पत्रकारांशी बोलत होते. डॉ. सोमनाथ म्हणाले, चांद्रयान-३ जवळपास सज्ज आहे. यासाठी आवश्यक सर्व गोष्टी पूर्ण झाल्या आहेत. आम्ही आता योग्य वेळेची वाट बघतोय. यावर्षी जून-जुलै मध्ये प्रक्षेपण केले जाईल. चांद्रयान-२ आणि चांद्रयान-३ चा उद्देश सारखा आहे. यावेळी मात्र सुरक्षित ‘लँडिग’साठी आवश्यक घटनांचा अधिक सक्षमतेने विचार करण्यात आला आहे. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर रोव्हर उतरवणे हा चांद्रयान-२ चा उद्देश होता. चांद्रयान-२ मोहिमेदरम्यान सप्टेंबर २०१९ मध्ये लँडर ‘विक्रम’ चंद्राच्या पृष्ठभागावर कोसळले होते. त्यानंतर चांद्रयान-३ ही मोहीम हाती घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. अवकाशातील ई-कचऱ्याबद्दल ते म्हणाले, अवकाशात दोन लाख टन ई-कचरा आहे. त्याचे सुमारे २० हजार तुकडे आहेत. ही गंभीर समस्या आहे. त्यावरील उपाययोजनांसाठी प्रयत्न सुरू आहेत. भारताच्या अंतराळ धोरणाची लवकरच घोषणा करण्यात येईल. फेब्रुवारी २०२२ मध्ये अंतराळ धोरणाच्या पहिल्या मसुद्यावर चर्चा झाल्यानंतर, अंतराळ विभागाने त्यावर काम केले. आता हा मसुदा पंतप्रधान कार्यालयाकडे पाठवला आहे. हे धोरण लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्यांना कायद्याचे बळ हवे आहे, असे डॉ. सोमनाथ म्हणाले. भारताकडे सध्या जी-२० चे अध्यक्षपद आहे. त्यानिमित्ताने देशात या समूहाचे वर्षभर कार्यक्रम होतील. यासाठी इस्रोच्या माध्यमातून दोन कार्यक्रम आखले आहेत. पहिला कार्यक्रम शिलॉंगमध्ये होईल. यामध्ये राजदूतांसमोर इस्रोचे सादरीकरण केले जाईल. बंगळूरु येथे होणाऱ्या दुसऱ्या कार्यक्रमात अंतराळ तंत्रज्ञान व उद्योग यांची सांगड घालून अर्थव्यवस्थेला गती देण्याबाबत चर्चा करणार असल्याचे डॉ. सोमनाथ म्हणाले. नवीन धोरणात भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) संशोधन, विकास आणि क्षमता विकसित करण्यावर अधिक लक्ष केंद्रित करणार आहे. शिवाय या क्षेत्रात खासगी संस्थांचा सहभाग वाढवण्याचा प्रयत्न राहणार आहे. अनेक भारतीय खासगी कंपन्या आणि स्टार्ट-अप्स अंतराळ सहभाग सेवा देण्यासाठी उत्सुकता दाखवत आहेत. त्यासाठी केंद्र सरकार अनुकूल असल्याचे डॉ. सोमनाथ यांनी सांगितले.



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

# वादळी व्यक्तिमत्त्व : विजय तेंडुलकर

आधुनिक केसरी

**ग्रंथाली वाचक चळवळीचे काम करत असताना विजय तेंडुलकर यांची भेट झाली आणि त्यानंतर आयोजित तेडुलकरांची संवाद यात्रेमध्ये आमच्या ग्रंथाली केंद्र जामनेर चा समावेश होता. त्याप्रसंगी विजय तेंडुलकर, ना.धों. महानोर, अरुण साधू, संजीव खांडेकर, ही मंडळी उपस्थित होती. तेंडुलकरांनी जमलेल्या रसिक आणि वाचकांची संवाद साधला. त्या सुमारास त्यांना पद्मभूषण हा पुरस्कार मिळाला होता.**

त्यानंतर एक दोन वेळा मुंबईला त्यांच्या घरी जाणे झाले त्यावेळेला त्यांनी चौकशी केली होती. मी एका धार्मिक मासिकात लिहितो हे त्यांना समजले होते. गणानाम् त्वां हे गजानन महाराजांच्या विषयी निघणारे मासिक होते. तेव्हा गप्पा गोष्टीत ते मला म्हणाले चांगले आहे. त्याच्याबरोबरच आपल्या आजूबाजूला समाजात अनेक गोष्टी घडतात आपण त्या बघतो पण ते टिपण्याचा प्रयत्न करत नाही तेव्हा अशा मनाला खटकणाऱ्या गोष्टी आपण शब्दातून मांडायला शिकले पाहिजे असे त्यांनी मला सांगितले होते.

विजय तेंडुलकरांचा जन्म 6जानेवारी , 1928 रोजी मुंबई येथील मुगभाट , गिरगांव येथला. त्यांचे वडील धोंडोपंत तेंडुलकर हे स्वतः लेखक, प्रकाशक आणि हौशी नट होते. या कौटुंबिक पार्श्वभूमीतून तेंडुलकरांवर संस्कार होत गेले. दि.बा. मोकाशी, वि.वि. बोकील, अनंत काणेकर, शिवरामपंत वाशीकर यांनी लिहिलेल्या साहित्याच्या वाचनातूनही मनाची घडण झाली.

तेंडुलकरांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले. त्या काळात जोमाने चालू असलेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ते सहभागी झाले. साहजिकच या कालखंडात विविध विचारसरणींशी त्यांचा जवळून परिचय झाला. त्यांचे वास्तव्य पुणे आणि मुंबई असे होते. लेखिका आणि अभिनेत्री प्रिया तेंडुलकर ही त्यांची मुलगी..

"श्रीमंत" हे त्यांचे रंगभूमीवरील पहिले नाटक पण "गृहस्थ" हे तेंडुलकर यांनी लिहिलेले पहिले नाटक हेच नाटक पुढे त्यांनी कावळ्याची शाळा या नावाने लिहिले. पुनर्लेखन केले.

सुरुवातीच्या नाटकांपासूनच माणसाच्या जीवनाचा, त्यांच्यात असलेल्या विकारांचा, एकटेपणाचा वेध घेण्याचा त्यांचा प्रयत्न होता.. विशिष्ट तत्त्वज्ञानाचा आणि विचारसरणीचा ठसा नाकारून तेंडुलकर मनस्वीपणे लिहीत गेले. 'शांतता! कोर्ट चालू आहे' यासारख्या नाटकातून समाजाला प्रसंगी बंडखोर वाटणारा विषय

तो ही त्यांनी निवडला.. 'सखाराम बाईंडर' मध्ये हाताळलेला स्फोटक विषय आणि 'घाशीराम कोतवाल' मध्ये हाताळलेला एक वेगळा विषय. त्यामुळेच नव्या-जुन्या कलावंतांना तेंडुलकरांनी लिहिलेल्या नाटकांचे आव्हान पेलण्याची ओढ सातत्याने राहिली. आणि त्याकडे ते आकर्षित होत गेले. सखाराम बाईंडर नाटक सुरू असताना कसे कसे अनुभव आले याविषयीचे बाईंडरचे दिवस हे पुस्तक सुद्धा प्रसिद्ध झाले आहे. कमलाकर सारंग यांनी लिखाण केलेले आहे.

ललित लेखनात त्यांनी-कोवळी उन्हे, रातराणी, फुगे साबणाचे, रामप्रहर, हे सर्व कोठून येते ? लिखाण केले.

संपादनात - दिवाकरांच्या नाट्यछटा, समाजवेध.

तेंडुलकरां विषयी किंवा त्यांच्या लेखनाविषयी लिहिली गेलेली पुस्तके-अजून तेंडुलकर ( संपादिका : रेखा इनामदार-साने )


तेंडुलकर : असेही तसेही ( मुकुंद टाकसाळे )

तेंडुलकर आणि हिंसा ( माहितीपट : निर्माते - अतुल पेठे )

तेंडुलकरांची नाटके ( डॉ. चंद्रशेखर बर्वे. )

पुण्यात अनेक व्याख्यानमाला होत असतात, त्यांत विजय तेंडुलकर स्मृती व्याख्यानमालाही होत असते.

माणूस नावाचे बेट', 'मधल्या भिंती', 'सरी गं सरी', 'एक हट्टी मुलगी', 'अशी पाखरे येती', 'गिधाडे', 'छिन्न' आदी नाटके रूढ सामाजिक संकेतांना, तसेच नाट्यसंकेतांना हादरा देणारी आणि वादग्रस्त ठरली. मानवी वृत्तीतील कुरूपता, हिंस्रता यांचे भेदक,



पण वास्तववादी उग्र,.कठोर, चित्रण असल्याने या नाट्यकृती गाजल्या. त्यावर वाद झालेत. आणि न्यायालयीन संघर्ष झाला. आशय आणि तंत्रदृष्ट्या असणारी विलक्षण विविधता, हे त्यांचे वैशिष्ट्य ठरले. तेंडुलकरांनी चित्रपट माध्यमही नाटकांच्याच ताकदीने हाताळले. सामना, सिंहासन, आक्रीत, उंबरठा, अर्धसत्य, आक्रोश, आघात, सरदार,इत्यादी चित्रपटांच्या पटकथा त्यांनी लिहिल्या. स्वयंसिद्धा या दूरचित्रवाणी मालिकेचे लेखनही त्यांनी केले. मानवी मनाचे, त्यातही त्याच्या कुरूपतेचे चित्रण करून अशा व्यक्तिरेखांना समजून घेण्यात, त्यांचे जीवन मांडताना मानवी नात्यातील संबंध, त्यातील ताण, त्या अनुषंगाने व्यवस्थांचे बंदिस्तपण टिपले आहे.

काव्य-कारुण्य, व्यक्ती-समाज, वास्तव-फॅन्टसी यांची कलात्मक सरमिसळ त्यांच्या नाटकांत आढळते. नवनाट्य, वास्तववाद यांच्याशी त्यांच्या लेखनाचे आंतरिक नाते दिसते. तरीही त्यांच्यावर कोणताही शिक्का मारता येत नाही इतकी प्रयोगशीलता दिसते.

"देशातील वाढता हिंसाचार" या विषयाच्या अभ्यासासाठी त्यांना १९७३-७४ मध्ये नेहरू शिष्यवृत्ती मिळाली होती.

त्यासाठी त्यांनी हिंसा हा विषय घेतला होता. त्यावेळी त्यांनी जेल, फाशीची शिक्षा जाहीर झालेली गुन्हेगार, फिरोज दारूवाला हत्याकांड असे अनेक फोटो टिपले होते. अजूनही त्यांचा एक चेहरा होता तो म्हणजे छायाचित्रण. नॅचरल फोटो काढण्याकडे त्यांचा कल होता. पोज दिलेली त्यांना आवडत नव्हते.

तसेच १९७९ ते ८१ दरम्यान त्यांनी "टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस" या संस्थेत अभ्यागत प्राध्यापक म्हणूनही काम केले. नवनाट्याविषयी आस्था बाळगणाऱ्या संस्था आणि त्यातील कार्यकर्त्यांबद्दल त्यांना जिव्हाळा होता.

त्यांनी सांहित्यातलेअनेक प्रकार हाताळले होते....

एकांकिका - अजगर आणि गंधर्व, थीफ : पोलिस, रात्र आणि इतर एकांकिका; समग्र एकांकिका ( भाग १ ते ३ )

कथा - काचपात्रे, गाणे, तेंडुलकरांच्या निवडक कथा, द्वंद्व, फुलपाखरू, मेषपात्रे.

कादंबरी - कादंबरी एक, कादंबरी दोन, मसाज.

चित्रपटांच्या पटकथा - अर्धसत्य, आक्रीत, आक्रोश, उंबरठा, कमला, गहराई, घाशीराम कोतवाल, चिमणराव, निशांत, प्रार्थना, २२ जून १८९७, मंथन, ये है चक्कड बक्कड बूम्बे बू, शांतता कोर्ट चालू आहे, सामना, सिंहासन, सरदार.ई. .

टॉक शो - प्रिया तेंडुलकर टॉक शो.

दूरचित्रवाणी मालिका - स्वयंसिद्धा.

नाटके - अजगर आणि गंधर्व, अशी पाखरे येती, एक हट्टी मुलगी, कन्यादान, कमला, कावळ्यांची शाळा, कुत्रे, गृहस्थ, गिधाडे, घरटे अमुचे छान, घाशीराम कोतवाल, चिमणीचं घर होतं मेणाचं, चिरंजीव सौभाग्यकांक्षिणी, छिन्न, झाला अनंत हनुमंत, त्याची पाचवी, जंबद्वीपचा मुकाबला,देवाची माणसे, नियतीच्या बैलाला, पाहिजे जातीचे, फुटपायरीचा सम्राट, भल्याकाका, भाऊ मुरारराव, भेकड, बेबी, मधल्या भिंती, माणूस नावाचे बेट, मादी ( हिंदी ), मित्राची गोष्ट, मी जिंकलो मी हरलो, विठ्ठला, शांतता! कोर्ट चालू आहे, श्रीमंत, सखाराम बाईंडर, सफर, सरी गं सरी.

नाट्यविषयक लेखन - नाटक आणि मी.

बालनाट्ये - इथे बाळे मिळतात, चांभारचौकशीचे नाटक, चिमणा बांधतो बंगला, पाटलाच्या पोरीचे लगीन, बाबा हरवले आहेत, बॉबीची गोष्ट, मुलांसाठी तीन नाटिका, राजाराणीला घाम हवा. अनेक पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले होते त्यात....

कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणाऱ्या "जनस्थान" पुरस्काराचे तेंडुलकर पहिले मानकरी होते. ( 1991 )

१९७० मध्ये संगीत नाटक अकादमी पुरस्कार, त्याच वर्षी कमलादेवी चट्टोपाध्याय पुरस्कार.

इ.स. १९७७ मध्ये मंथनसाठी सर्वोत्कृष्ट पटकथेचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, १९८१ मध्ये आक्रोश चित्रपटासाठी फिल्म फेअरचा सर्वोत्कृष्ट कथा व पटकथा पुरस्कार; तर १९८३ मध्ये अर्धसत्यसाठी पुन्हा सर्वोत्कृष्ट पटकथेसाठी फिल्म फेअर पुरस्कार त्यांना मिळाला.

पद्मभूषण ( 1984 ), महाराष्ट्र गौरव, सरस्वती सन्मान, मध्य प्रदेश सरकारचा कालिदास सन्मान, विष्णूदास भावे गौरवपदक,

पु.ल. देशपांडे बहुरूपी सन्मान, तन्वीर सन्मान आदी इतर पुरस्कारही त्यांना मिळाले. इ.स. १९९८ मध्ये त्यांना संगीत नाटक अकादमीची अभ्यासवृत्ती मिळाली होती.

तेंडुलकरांच्या लेखनाबरोबरच त्यांच्या मुलाखतीही तितक्याच गाजल्या. त्यातून अनेक वादविवादही झडले. त्यांचा स्वभावच वादळे अंगावर घेण्याचा होता.. त्यातूनच हजारो लोकांचे आयुष्य उद्ध्वस्त करणारी माणसे आज समाजात आहेत. त्यांचे मारेकरी होण्यास मला आवडेल असे जळजळीत उद्गारही बाहेर पडले. पुरस्कार स्वीकारताना जाहीर व्यासपीठावरून आमच्या पिढीने स्वतःलाच फसवले अशी खंतही तितक्याच सहजपणे व्यक्त केली होती.

19 मे 2008 मध्ये हे वादळ शांत झाले. साहित्यक्षेत्रात विजय तेंडुलकर यांचे वेगळेच स्थान होते. साहित्य संमेलनाध्यक्ष होण्यासाठी जे काही प्रकार चालतात व आपल्या ऐकण्यात वाचण्यात येतात तसे त्यांनी कुठलेही प्रकार अवलंबले नाही. परिणामी त्यांना अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळायला हवे असतानाही मिळाले नाही असे खेदाने म्हणावे लागते.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

# जीवघेणा नायलॉन मांजा

आधुनिक केसरी

**जानेवारी महिना उजाडला की सर्वांना वेध लागतात ते मकर संक्रांत या सणाचे. मकर संक्रात हा हिंदू धर्मातील एक महत्वाचा सण मानला जातो. मकर संक्रातीनिमित्त पतंगोत्सव साजरा करण्याची आपल्याकडे खूप जुनी परंपरा आहे. रंगीबेरबगी पतंग आकाशात उडवून हा उत्सव साजरा केला जातो. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण पतंग उडवण्याचा आनंद या निमित्ताने घेत असतात पण अलीकडे हा खेळ जीवघेणा ठरत आहे.**

पूर्वी पतंग उडवण्यासाठी दोऱ्याचा किंवा घरगुती मांज्याच्या वापर केला जायचा आता मात्र पतंग उडवण्यासाठी नायलॉनच्या मांज्याच्या वापर केला जातो. हाच नायलॉन मांजा जीवघेणा ठरत आहे. मागील महिन्यातच दौंडमध्ये नायलॉन मांज्याने गळा कापून एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला होता. मागील वर्षी नाशिकमध्येही अशीच एक घटना घडली होती. पुण्यातही नायलॉन मांज्याने एका तरुण महिला पत्रकाराचा बळी घेतला होता. नायलॉन मांज्याने अनेक जण जखमी झाले आहेत. या मांज्यामध्ये अडकून आकाशात मुक्त विहार करणारे पक्षीही जखमी होतात काही पक्षी मरणही पावतात. चिनी बनावटीचा हा मांजा नायलॉन धागा, काचेचा चुरा, लोखंडाचे कण आणि रासायनिक पदार्थांपासून बनवला जातो. नायलॉन मांजा माणसांसह पक्षी आणि प्राण्यांसाठी देखील घातक आहे वास्तविक नायलॉन मांजाच्या खरेदी आणि विक्रीवर बंदी घालण्याचे आणि वापराबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश सरकारने दिले आहेत. मांजामुळे पशुपक्षांना होणाऱ्या दुखापतीचा संदर्भात पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालयाने राज्य सरकारला पत्र पाठवले होते. नायलॉन मांजामुळे वन्यजीव ( संरक्षण ) अधिनीयम १९७२ अनुसुचितील वन्यप्राणी पक्षांचा मृत्यू झाल्यास किंवा त्यांना दुखापत झाल्यास वन



कायद्याच्या ९ नुसार कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले होते त्यामुळे महाराष्ट्र सरकारने नायलॉन मांज्याच्या खरेदी आणि विक्रीवर बंदी घातली होती. महाराष्ट्र सरकारने बंदी घातलेली असतानाही हा मांजा दुकानात सर्रास विकला जात आहे. बंदी असूनही काही ठिकाणी लपून छपून तर काही ठिकाणी खुलेआम मांजा विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई होताना दिसत नाही. जो मांजा लोकांना दुकानात खरेदीसाठी मिळतो तोच मांजा प्रशासनाला कसा दिसत नाही ? आणखी किती बळी गेल्यावर प्रशासनाला जाग येणार आहे ? प्रशासनाने नायलॉन मांजा विरोधात धडक मोहीम राबवायला हवी. नायलॉन मांजा विकणारा आणि खरेदी करणारा अशा दोघांवर कारवाई व्हायला हवी. नागरिकांनीही नायलॉन मांजाने पतंग उडवण्याऐवजी दोरीचा वापर करून पतंग उडवावी आणि हा उत्सव साजरा करावा.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# मातृभाषेतील शिक्षणाचा अर्थपूर्ण उपक्रम

आधुनिक केसरी

**सशक्त भारताच्या उभारणीसाठी आणि प्रभावी शिक्षणासाठी मातृभाषेतील शिक्षणाची सर्वात महत्त्वाची भूमिका आहे. आपल्या समाज आणि राष्ट्रानुसार शिक्षण घेतल्यास आणि आपल्याच भाषेत शिक्षण दिल्यास ज्ञानाची नवी क्षितिजे उघडतील, नवनिर्मितीचे नवे आयाम समोर येतील. मातृभाषेतील विचार आणि शिकवण्यामुळे सर्जनशीलता आणि स्वतःची ओळख कळेल. खरं तर, स्व-भाषा विचार, विचारसरणी, कल्पनाशक्ती आणि त्यांच्या व्यापक सामाजिक-राष्ट्रीय तत्त्वज्ञानाच्या स्पष्टतेचे माध्यम बनतात.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर करताना मातृभाषेची स्थापना करण्याचा अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. त्यामुळे मातृभाषा आणि भारतीय भाषांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि या भाषांमध्ये उच्च शिक्षण देण्याची परिस्थिती देशात निर्माण होऊ लागली आहे. असाच निर्णय अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्याच्या संलग्न अभियांत्रिकी महाविद्यालयांसाठी शैक्षणिक सत्र २०२१-२२साठी घेतला आहे, ज्या अंतर्गत भारतीय भाषांमध्ये अभ्यासक्रम चालवण्याची परवानगी दिली जात आहे. परिषदेने आपल्या ताज्या मान्यता प्रक्रियेत अशा तरतुदी केल्या आहेत, जी मोदी सरकारच्या मातृभाषेतील शिक्षणाला चालना देण्याच्या प्रयत्नांचा एक भाग आहे आणि नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत एक शुभ सुरुवात आहे. नोव्हेंबर २०२० मध्ये, शिक्षण मंत्रालयाने महाविद्यालयांना मातृभाषेतून अभियांत्रिकी शिक्षण देण्याची परवानगी देणारा प्रस्ताव मंजूर केला होता. त्यानुसार आता महाराष्ट्रात देखील सर्व प्रकारचे शिक्षण मराठीतून दिले जाणार असल्याचं प्रतिपादन उपुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे

सरकारचा निर्णय ताजा असतानाच आता महाराष्ट्रातही मराठीतून वैद्यकीय दिल्या जाणार आहे. याबाबतची मोठी माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीश महाजन यांनी मागे केली होती. आता परत एकदा उपुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व प्रकारचे शिक्षण मराठीतून देण्याचा पुनरुच्चार केला आहे. महाराष्ट्रात वैद्यकीय व शिक्षण मराठीतून देण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. अभ्यासक्रमाची पुस्तके मराठीतून तयार होत आहे.अभियांत्रिकी एआयसीटीईचे अध्यक्ष अनिल सहस्त्रबुद्धे यांच्या म्हणण्यानुसार, भारतीय भाषांमध्ये अभियांत्रिकी शिक्षण देऊ इच्छिणारी महाविद्यालये परिषदेकडे अर्ज करू शकतात आणि त्यांनी आवश्यकता पूर्ण केल्यास त्यांना अभ्यासक्रम सुरू करण्याची परवानगी दिली जाईल. परिषदेने सध्या बंगाली, गुजराती, हिंदी, कन्नड, मल्याळम, मराठी, तमिळ आणि तेलगू अशा आठ भारतीय भाषांमध्ये मजकूर-साहित्यांचे भाषांतर करण्याचे काम सुरू केले आहे. सहस्त्रबुद्धे यांच्या म्हणण्यानुसार, देशभरातील १३० हून अधिक शिक्षक, विविध भाषांमधील प्राविण्य असलेले, इंग्रजीतून बंगाली, गुजराती, हिंदी, कन्नड, मल्याळम, मराठी, तामिळ आणि तेलुगू या आठ भारतीय भाषांमध्ये अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे भाषांतर करण्याचे काम करत आहेत.

विशेष म्हणजे परिषदेने त्यांच्या संलग्न महाविद्यालयांतील ८३ हजार विद्यार्थ्यांचे मातृभाषेतून शिक्षण घेण्याची त्यांची इच्छा तपासण्यासाठी सर्वेक्षण केले होते. त्यापैकी सुमारे ४४ टक्के लोकांनी मातृभाषेतून शिक्षण घेण्याची इच्छा दर्शवली. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मध्ये भारतीय भाषेचा पर्याय सुरू करण्याबाबतही योग्य वेळी निर्णय घेतला जाईल. समितीतील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आयआयटीमधील सुमारे १५-२० टक्के विद्यार्थ्यांनी त्यांच्या मातृभाषेत अभियांत्रिकी शिक्षण घेण्याची इच्छा दर्शविली आहे. परिषदेने हा पर्याय फक्त पारंपारिक अभियांत्रिकी शाखांसाठी खुला ठेवला आहे- मेकॅनिकल, सिव्हिल, कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक. या विषयांच्या अभ्यास साहित्यावरही काम सुरू केले आहे. लोकसभेत भारतीय भाषांमधील सामग्रीच्या उपलब्धतेबाबत विचारलेल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरात एमओईने असेही सांगितले की त्यांनी विविध भारतीय भाषांमध्ये अभ्यासक्रम सामग्रीचे भाषांतर करण्यास सुरुवात केली आहे.

मातृभाषेतील शिक्षण व मातृभाषेतील शिक्षण अधिक प्रभावी व उपयुक्त आहे, कारण विद्यार्थी मातृभाषेतील शिक्षण सहज स्वीकारतो, यामध्ये विद्यार्थ्यांची आत्मसात करण्याची क्षमता अधिक असते. कारण स्वतःच्या भाषेशी निगडित असलेले दृढ मनोबल आणि आत्मीयता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्वाचा विकास घडवून आणते, त्याची तार्किक दृष्टीही विकसित होते. विद्यार्थ्यांचे मातृभाषेतील शिक्षण त्याच्या मानसिक, भावनिक, त्याचा बौद्धिक आणि नैतिक विकासावरही परिणाम होतो. मातृभाषेतून शिकवणे सोपे आणि सोपे होते. परिणामः विद्यार्थी हळूहळू आवडीच्या क्षेत्रात प्रवीणता प्राप्त करतात. विद्यार्थ्यामध्ये असलेली



ही कार्यक्षमता नवनवीन कल्पना विकसित करण्यासाठी आणि त्याची अंतर्दृष्टी विकसित करण्यासाठी उपयोगी पडते. सध्याच्या काळात स्वभाषा आणि मातृभाषेचे महत्त्व आणि व्यक्तिमत्त्व घडवण्याची जबाबदारी अधिक समर्पक झाली आहे. कारण सर्वांगीण क्षमता वाढविल्याशिवाय काळाशी सुसंगत राहणे आणि स्वतःला टिकवणे फार कठीण आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने हे गांभीर्याने स्वीकारले आहे, हे भारताला ज्ञानमय समाजात बदलण्याची यशस्वी योजना ठरेल हे निश्चित. आज आमच्याकडे जगापर्यंत पोहोचण्याची एक अद्भुत संधी आहे जी पूर्वी कधीच नव्हती. हे सर्व बदल प्रत्यक्षात आणण्याचा निर्धार करणारे नेतृत्व आज आपल्याकडे आहे. फक्त सकारात्मक प्रयत्न करून योग्य दिशेने वाटचाल करायची आहे आणि मातृभाषेतून शिकवण्याला प्राधान्य देण्याची गरज आहे. आपला देश जगातील सर्वात तरुण देश आहे. आपल्या या तरुण मनुष्यबळाचा योग्य उपयोग करून आपण महासत्ता होण्याच्या दिशेने अर्थपूर्ण हस्तक्षेप करू शकतो. आपल्या तरुणांना नवीन कौशल्ये आणि नवीन ज्ञानाने सुसज्ज करून आपण जगात विजयाची पताका फडकवू शकतो. ज्यामध्ये स्व-भाषा, स्व-संस्कृती आणि स्व-ओळख यांची अर्थपूर्ण भूमिका असते.

भारत महासत्ता बनण्याचे स्वप्न पूर्ण करू शकतो. हे उदात्त उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि शैक्षणिक क्षेत्रात नावीन्य आणि संशोधनाची मोहीम अधिक तीव्र करण्याबरोबरच मातृभाषेतील शिक्षणाला प्राधान्य द्यावे लागेल. दर्जेदार शिक्षणाचा आधार ठरणाऱ्या या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाकडून या दिशेने मोठी आशा आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी निगडित नवे आयाम आणि नवीन उद्दिष्टे साध्य करण्यात मातृभाषेतील शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावेल. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ज्या प्रकारे मातृभाषेशी बांधिलकी असलेल्या नव्या भारताच्या निर्मितीचा पाया मांडते, त्यातून समाजात आणि राष्ट्रात नवनवीन आणि नवनिर्मितीतून नवीन आदर्श निर्माण होतील.

जेव्हा मातृभाषा शिक्षणाचे माध्यम होईल तेव्हा मौलिकता समाजात सर्जनशीलतेची मोहीम सुरू करेल. नवीन धोरणात भाषा आणि गणिताला प्राधान्य दिल्याने मुलांमध्ये लेखन कौशल्य आणि नाविन्य निर्माण होईल. सर्जनशील क्रियाकलापांचे वातावरण तयार होईल. कथाकथन, नाटक, गटचर्चा, लेखन आणि स्मार्ट डिस्प्ले बोर्ड नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पारंपारिक अध्यापन पद्धती, नवीन अभ्यास संस्कृती विकसित करणे, अध्यापन आणि संवाद हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण खऱ्या अर्थाने नवीन बनवते. संस्कृतीशीही जोडते. तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देण्याचा उपक्रम कोरोनाच्या संकटामुळे या दृष्टिकोनातून नवीन धोरण अधिक प्रभावी करण्याच्या दिशेने जाईल. यासाठी तंत्रज्ञानामुळे संगणक, लॅपटॉप, फोन आदींसह मातृभाषेतून शिक्षणाची गोडी निर्माण करून शिक्षणाची भविष्यातील परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलेल.

संपूर्ण देशात सांस्कृतिक आणि भावनिक एकता प्रस्थापित करण्याचे मुख्य माध्यम म्हणजे मातृभाषा. भारताची परिपक्व लोकशाही, प्राचीन सभ्यता, समृद्ध संस्कृती आणि अद्वितीय राज्यघटना यांना जगात उच्च स्थान आहे, त्याचप्रमाणे भारताच्या प्रतिष्ठेचे आणि अभिमानाचे प्रतीक असलेल्या मातृभाषांचा विकास करणे हे आपले प्राधान्य असले पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजवटीत शाळा, महाविद्यालये आणि तंत्रशिक्षणात हिंदी आणि इतर भारतीय भाषांना प्रतिष्ठा मिळायला हवी, या दिशेने सध्याचे सरकारचे प्रयत्न उल्लेखनीय आणि स्तुत्य असले तरी याला अधिक गती मिळणे अपेक्षित आहे. गती कारण या दृष्टिकोनातून महात्मा गांधींचे अंतर्ज्ञान समजून घ्यावे लागेल , ज्यात त्यांनी म्हटले आहे की “आवश्यक भाषेशी संबंधित बदलात एक दिवसाचा विलंब म्हणजे हिंदीची अंमलबजावणी करणे हे सांस्कृतिक नुकसान आहे. माझा युक्तिवाद असा आहे की ज्याप्रमाणे आपण ब्रिटीश लुटारूंची राजकीय राजवट यशस्वीपणे संपवली आहे, त्याचप्रमाणे इंग्रजांना सांस्कृतिक लुटारू म्हणून तत्काळ हद्दपार करा. स्वतंत्र भारताच्या जवळपास सात दशकातही आपण हिंदी आणि भारतीय भाषांना त्यांचे मानाचे स्थान देऊ शकलो नाही, ही उपरोधिक आणि आपल्या राष्ट्रवादावर गंभीर प्रश्नचिन्ह आहे.



अमोल मोकासे
पिशोर, जि.औरंगाबाद

# स्त्रीवाद आणि शिक्षण

आधुनिक केसरी

**नमस्कार, मी अमोल सोनाजी मोकासे, शिक्षक समता प्रा. विद्यामंदिर, पिशोर. आजचा हा दिवस इतिहासामध्ये विशेष होवून गेला कारण आज 1831 मधे त्या स्त्री चा जन्म झाला जीच्यामुळे महाराष्ट्राचाच नव्हे तर संपूर्ण भारताचा अवतार बदलला. आज 3 जानेवारी म्हणजेच क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती. आजचा हा उत्सव आपण एका स्त्री ने केलेल्या कार्याची दखल घेण्यासाठी करत आहोत म्हणून माझा आजच्या चर्चेचा विषय “सावित्रीबाईंच्या निमित्ताने...स्त्रीवाद आणि शिक्षण” मी क्रांतीज्योतींना समर्पित करतो व वंदन म्हणून या वाघिणीच्या चरणी अर्पण करतो.**

आजचा विषय हा थोडा वेगळा आहे कारण नेहमीच्याच गोष्टी सांगितल्या तर तुम्ही ऐकणार नाही आणि निश्चितच त्या गोष्टी तुम्हाला माझ्यापेक्षा अधिक माहिती असणार त्यामुळे माझा विषय “सावित्रीबाईंच्या निमित्ताने.... स्त्रीवाद आणि शिक्षण” हा इथे बसलेल्या मुलींसाठी स्त्रियांसाठी खूप महत्त्वाचा आहे, खरतर माझा विषय स्त्रियांवर आहे परंतु आज ज्यांना माझ्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे ते म्हणजे इथे उपस्थित सगळे पुरुष मंडळी. खासकरून हे लहान मुलं, ते कॉलेज कुमार आणि समोर बसलेला हा युवा वर्ग कारण एक जूनी म्हण आहे की जुण खोड आकार घेत नाही, त्यासाठी कवळी काडीच लागते. मग सुरवातही पहिल्या शब्दापासूनच करुया. स्त्रीवादापासूनच करूया. आता काही म्हणतील याचं बरं आहे! सुरूवातही वादापासूनच करायची याला! पण मित्रांनो हा वाद खूप चांगला आहे इतका चांगला की हा वाद दररोज तुमच्या पारावर आणि नाक्यावर झाला पाहिजे. माझा पहिला प्रश्न-काय आहे हा स्त्रीवाद ? किंवा आता सध्या फॅशन मध्ये असलेला फेमिनिझम ( Feminism ) ? कोणाला माहिती असेल तर उत्तर देऊ शकता. थोडक्यात स्त्रीवाद किंवा feminism म्हणजे अशी विचारधारा जी स्त्रियांच्या समान सामाजिक, आर्थिक व राजकीय हक्कांसाठी लढते. अजून थोडक्यात सांगायचे तर Equality, समानता, समता, मागणारी ही विचारधारा आहे. मग ही समानता कोणाबरोबर ? तर पुरुषांबरोबर! जेवढे अधिकार, हक्क, स्वातंत्र्य आणि सुख-सोयी पुरुषांना आहे तेवढयाच ह्या स्त्रियांना द्या हे सांगणारी विचारधारा म्हणजे स्त्रीवाद. गैरसमज होऊ शकतो की फेमिनिझम म्हणजे स्त्रियांसाठी विशेष अधिकार मागणारी विचारधारा पण तो कसाही बघितला तर गैरसमजच राहणार! बरं फेमिनिस्ट ( Feminist ) किंवा स्त्रीवादी कोण होऊ शकतो ? पुरुष की स्त्री ? उत्तर आहे- एक स्त्री, एक पुरूष आणि एक किन्नर हे तिघे फेमिनिस्ट असू शकतात पण आम्ही पुरुष मंडळी खूप हुशार आहोत ह्या Feminism ची हवाच आम्ही होऊ दिली नाही. त्यात आमचे हे दळभद्री न्यूज चॅनल वाले कतरीना कैफ च्या लग्नाला राष्ट्रीय विषय बनवून ती बातमी हप्ता भर टीव्ही वर चालवणार, राहुल गांधी ने भारत जोडो यात्रेत दाढी का वाढवली याच्यावर आठवडा भर डीबेट घेणार अरे जाऊ द्या ना! नसेल सापडला त्याला वस्तरा तुम्हाला काय पडलं एवढ पण यांना मूळ मुद्दा दाखवायचाच नाही आणि स्त्रीवादा सारखा विषय अगदी धूळ झाडल्यासरखा अलगद झाडून टाकायचा. आमच्या ग्रामीण भागातील पुरुष मंडळी तर अजूनच हुशार, हे गल्लीत बसून दिल्ली गाजवता म्हणे. यांनी तर “स्त्रीवाद” नावाचा विषय अस्तित्त्वात आहे हे देखील आमच्या महिलांना कळु दिलेले नाही. परंतु जेव्हा एका स्त्री च्या पाठीमागे नाही तर तिच्या सोबत एक पुरुष उभा राहतो तेव्हा काय होऊ शकते याचे उदाहरण बघायचे असेल तुमच्या खिशातील मोबाईल बाहेर काढा आणि Google वरती सर्च करा First female teacher in india. पहिलंच नाव अगदी बोल्ड अक्षरामध्ये येतं ते म्हणजे सावित्रीबाई फुले. जेव्हा एक पुरुष एका स्त्री सोबत उभा राहतो तेव्हा एक निरक्षर स्त्री सुध्दा भारतातील पहिली शिक्षिका बनते. ही शक्ती आहे या दुर्लक्षित स्त्रिवादामध्ये.आता थोड इतिहासाकडे वळूया. प्राचीन भारतात स्त्रीवादाची सुरूवात झाली ती इसवी सन पूर्व 600 मध्ये. हो आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. त्या काळी लोकांचा धार्मिक कल हा उच्चतम शिखरावर होता आणि याचा फायदा फक्त ब्राह्मण वर्गाला झाला होता. याच काळात लोकांना मोक्ष मिळवण्याचे वेड लागले होते व त्यासाठी ब्राम्हणांनी कर्मकांड हा मार्ग सुचवला ज्यामधे विविध यज्ञ करणे, ब्राम्हणाला दान करणे व विविध पूजा ब्राम्हणाच्या हाताने करून घेणे. हा तो काळ होता ज्या काळी ब्राम्हण सोडले तर इतर कोणालाही धर्म ग्रंथ, वेद, पुराण वाचण्याची परवानगी नव्हती, अगदी राजघराण्याला सुध्दा! ह्या असल्या परिस्थितीमध्ये स्त्रिया मोक्षपसून वंचित होत्या कारण फक्त त्या स्त्रिया होत्या! त्यांना यज्ञ करण्याची, वेद,पुराण बघण्याची अनुमती सुध्दा नव्हती. परंतु या काळोखात आशेचा एक किरण आला ते म्हणजे गौतम बुद्ध. जेव्हा गौतम बुद्धांनी संघाची स्थापना केली तेव्हा त्यांनी स्त्रियांना भिक्षूनी म्हणून संघात सामील करून घेतले. त्या स्त्रियांना वेद पुराण वाचण्याची संधी उपलब्ध करून दिली आणि त्यांना कोणत्याही इतर पुरुषाप्रमाणे जन्म व मरण या चक्रातून मुक्त होण्याचा अधिकार मिळवून दिला. प्राचिन भारतात ही पहिली



वेळ होती जेव्हा एक स्त्री आणि एका पुरुष समान होती. याचाच अर्थ गौतम बुद्ध हे प्राचीन भारतातले पहिले स्त्रीवादी पुरूष होते. मात्र आधुनिक काळात स्त्रीवादाची अनौपचारिक सुरुवात ही 1848 साली झाली, जेव्हा 300 महिला आणि पुरुष एकत्रपणे स्त्रियांच्या समान हक्कांसाठी अमेरिकेतील न्यू यॉर्क शहराच्या रस्त्यावर उतरले होते. हा सगळा प्रकार भारताच्या बाहेर सात समुद्रा पलिकडे घडत असताना माझ्या महाराष्ट्रात एक वादळ उठण्याच्या बेतात होतं. वयाच्या अवघ्या 21 व्या वर्षी एक मुलगा अहमदनगर येथील मुलींच्या ख्रिश्चन मिशनरी शाळेला भेट देतो व ते चित्र बघून अस्वस्थ होतो - Cynthia Farrar नावाची एक विदेशी महिला जीचा ह्या देशाशी काही संबंध नाही, ह्या अस्पृश्य मुलींशी काही संबंध नाही आणि तीच महिला येथिल मुलींना शिकवत होती. ह्या घटनेने तो तरुण स्वतः ला प्रश्न करू लागला की तू या मातीचा, या देशाचा मग तू काय केले या मातीसाठी या देशासाठी या देशातील लोकांसाठी ? काय योगायोग घडावा तो मुलगा त्याच वर्षी म्हणजे थॉमस पैन यांचे Rights of Man हे असाधारण पुस्तक वाचतो आणि तेव्हापासूनच त्याच्यामध्ये सामाजिक न्यायाबद्दल विशेष जाणीव निर्माण होते. भारतीय समाजव्यवस्थेतील शोषित वर्ग आणि महिला वर्ग प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगत आहे, विषमतेच्या दलदलीत आहेत त्यामुळे ह्या लोकांना असल्या असामाजिक आणि भेदभावाच्या परिस्थितीतून बाहेर काढायचे असेल तर त्यांना शिक्षण देण्याची गरज आहे, फक्त शिक्षित नव्हे तर त्यांना सुशिक्षित करण्याची गरज आहे हा दिव्य समज त्या तरुणाच्या डोक्यात जागा होतो. समाजात परिवर्तन घडवून आणायचे असेल तर महिलांना शिकवावे लागेल हे वादळ डोक्यात घेवुन मिरणारा तो मुलगा म्हणजे आमचे महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले. वयाच्या अवघ्या 21 साव्या वर्षी डोक्यात असले समाज परिवर्तनीय विचार येण्यासाठी व्यक्ती हा सुशिक्षित लागतो केवळ शाळेत, कॉलेज मधे जावून डिग्री चे कागदं गोळा केलेला नाही कारण हे कागदं तुम्ही कॉलेज मध्ये जावून परीक्षा पास झाल्याची साक्ष देतात, तुम्ही सुशिक्षित आहे याची नाही.

स्त्रीवाद किंवा Feminism फॅशन मध्ये आला तो 1902 मध्ये जेव्हा Elizabeth Santon नावाच्या महिलेने स्त्रीवाद या चळवळीची खरी विचारधारा व राजकीय रणनीती आखली होती. मात्र भारतामध्ये स्त्रीवादाची सुरुवात महात्मा फुलेंनी 54 वर्षांपूर्वीच केली होती. जेव्हा हे विदेशी लोक लेखी सूत्रे मांडत होते त्याच्या 54 वर्षांपूर्वी आमच्या महात्मा फुलेंनी जगाला स्त्रीवादाचे प्रात्यक्षिक करून दाखवले होते परंतु या विदेशी लोकांनी ठरवलंच होत की भारताचे शोषण होईल त्या मार्गाने करायचे- आमचा इतिहास बदलायचा, आमची संस्कृती भ्रष्ट करायची, आमची अलौकिक बुद्धिमत्ता लालुच दाखवून तिकडे घेवुन जायची, आमचे तत्वज्ञान तोडून मोडून त्यावर संस्करण करून स्वतःचे सांगायचे आणि आमच्या महापुरुषांना शक्य तितक्या काळाआड टाकायचं. हे 21 व शतक आहे आज आपल्या हातात जो मोबाईल आहे त्याचा Facebook, WhatsApp, YouTube, Instagram, ticktock, Snapchat आणि इतर रिकामे कामं यांच्यापलिकडे जावून सुध्दा उपयोग आहे, हे जाणण्याची आणि शिकण्याची आम्हाला तात्काळ गरज आहे. ह्या google चा वापर करून आपल्याला खूप चांगली माहिती सुध्दा गोळा करता येते. आज मी ह्या निकषावर पोहचलो की आधुनिक जगातील पहिले स्त्रीवादी पुरुष जर कोणी असतील तर ते म्हणजे महात्मा फुले मात्र भारतामधे हा अधिकृत मान मिळाला तो ताराबाई शिंदे यांना त्यांच्या “स्त्री-पुरुष तुलना” या पुस्तकासाठी परंतु त्या सुध्दा सत्यशोधक समाजाच्याच कार्यकर्त्या होत्या ज्याची स्थापना महात्मा फुले यांनी 1873 मध्येच केलेली होती. महात्मा फुलेंना पहिले स्त्रीवादी किंवा Feminist मानण्याचे कारण म्हणजे ज्या थॉमस पैन यांचा फुलेंवर वैचारिक प्रभाव पडलेला होता त्या पैन चे Rights of Man हे पुस्तक मी डाऊनलोड केले आणि सहज कुतुहल म्हणून मी त्यात Woman हा शब्द search केला तर मला आश्चर्य वाटले कारण त्यात तो शब्द केवळ दोनच वेळा आलेला होता. पुस्तक वाईट नाही एकंदरीत खूप चांगलच आहे परंतु फुलेंनी त्या पुस्तकाच अनुकरण न करता स्वतःचा नवीन दृष्टीकोन निर्माण केला व त्यांनी आपल्या समाजातील समस्या ओळखून त्यासाठी काम केलं, स्त्रियांच्या शिक्षणासाठी काम केलं, त्यांना पुरुषांच्या बरोबरीने वागणूक दिली. हे करणं पुरेसे नाही का आधुनिक जगातील पहिले स्त्रीवादी होण्यासाठी ? इतर कोणत्याही देशातील समाज सुधारकांनी स्त्रियांसाठी एवढं प्रत्यक्ष केलेलं नसेल जेवढं आमच्या महात्मा फुलेंनी करून ठेवलेलं आहे. दुर्दैवाने फुलेंना जास्त काळ सत्यशोधक समाजाकडे लक्ष देता आले नाही कारण 1890 ला पॅरालिसिस मुळे त्यांना जगाचा निरोप घ्यावा लागला व भारताच्या क्रांतीसूर्याचा अस्त झाला.

**क्रमशः**

# बिमल रॉय : हिंदी चित्रपटसृष्टीला दिशा देणारे दिग्दर्शक




मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**ज्या काळात हिंदी चित्रपटांमध्ये धार्मिक आणि ऐतिहासिक विषयांचे वर्चस्व होते, तेव्हा बिमल रॉय यांनी स्वत:ला सामाजिक आणि उद्देशपूर्ण चित्रपटांपुरते मर्यादित केले.शेतकरी, मध्यमवर्ग आणि महिलांचे प्रश्न त्यांनी आपल्या चित्रपटांतून मांडले. ते त्यांच्या काळातील ज्वलंत प्रश्नांपासून कधीही दूर गेले नाहीत. बिमल रॉय यांनी प्रसिद्ध साहित्यकृतींवर अप्रतिम चित्रपटही बनवले. तगडी कथा-पटकथा-संवाद, उत्कृष्ट चित्रीकरण आणि सुरेल गाणी-संगीत ही त्यांच्या सर्वच चित्रपटांची ओळख आहे.**

बिमल रॉय यांच्याशिवाय हिंदी सिनेमाची कल्पनाच करता येत नाही, हे एक सत्य आहे. बिमल रॉय हे खरंच हिंदी चित्रपटसृष्टीतील एक नक्षत्र आहे, ज्याची चमक कधीच फिकी पडणार नाही. फिल्मी दुनियेत त्यांचा सिनेमा 'बिमल रॉय स्कूल' या नावाने ओळखला जातो. ज्यांच्याकडून अनेक पिढ्या प्रशिक्षित होत राहतील. भारतीय चित्रपटसृष्टीत असे वेगळे स्थान फार कमी चित्रपट दिग्दर्शकांनी मिळवले आहे. बिमल रॉय यांनी खूप सुंदर चित्रपट भारतीय प्रेक्षकांना दिले. जीवनाच्या वास्तवतेला कलात्मकता आणि काव्यात्मकतेचं सौंदर्यलक्ष्यी परिणाम देऊन रुपेरी पडद्यावर एखाद्या उत्कट कवितेसारखं चितारणाऱ्या , भारतीय जीवनशैलीचं हृद्य दर्शन घडवणाऱ्या , साहित्यकृती, अमर व्यक्तिरेखा यांचं प्रतिबिंब ज्यात आहे अशा श्रेष्ठ चित्रपटांची देणगी भारतीय रसिकांना दिली. निर्माता, दिग्दर्शक, कॅमेरामन बिमल रॉय यांचा जन्म 12 जुलै 1909 रोजी पूर्व बंगालमधील ढाक्क्याजवळच्या सौपूर या गावचे जमीनदार हेमचंद्र रॉय यांच्या संयुक्त विशाल अशा कुटुंबात झाला. अत्यंत संवेदनशील, पण बुद्धिमान असलेला हा मुलगा निसर्गाचा वेडा होता.

ब्रिटिश शाळेत त्याचं शिक्षण झालं. पेंटिंग काढण्यात , व्हायोलिन वाजवण्यात तर तळ्याकाठी , आमराईत रमणारा हा मुलगा मितभाषी होता. ढाक्क्याच्या जगन्नाथ महाविद्यालयात इंटरला असताना वडिलांचं निधन झालं. भावंडं इंग्लंड, कोलकाता येथे शिकत होती. आईजवळ बिमल एकटा होता. त्यानंतर घरातल्या मुनिमनं सर्व संपत्तीचा अपहार केला. जमीनदारी एका रात्रीत गेली. घर, जमीन, शेत, तलाव सर्व गेलं. दक्षिण कोलकात्यात शिक्षण सोडून आणि आईला घेऊन ते राहायला आले. त्या वेळी कोलकात्यात 'न्यू थिएटर्स' ही नामवंत चित्रनिर्मिती संस्था उदयास येत होती. लहानपणी दुर्गापूजेत सर्वांना जमवून 'यहुदी की लडकी' किंवा 'मिसर कुमारी' सारखी नाटकं बसवणारे बिमलदा , कॅमेरा चालवण्यात तरबेज होते. न्यू थिएटरमध्ये दिग्दर्शक- कॅमेरामन नितीन बोस यांचे सहायक कॅमेरामन म्हणून रुजू झाले. न्यू थिएटर्सच्या मीरा, गृहदाह, देवदास, माया, मुक्ती, अभिनेत्री अशा चित्रपटांतून हे नाव चमकू लागलं. पोस्टरवर प्रमुख अभिनेत्यांच्या जोडीला बीमलदाचं नाव प्रकाशित होत असे. ते स्टार कॅमेरामन झाले. प्रत्येक अभिनेत्री त्यांच्याकडून फोटो काढून घेण्यास उत्सुक असत. तरुण बिमलदांवर शरत साहित्याचा प्रभाव होता. प्रथमेश बारुआबद्दल , नितीन बोसबद्दल आकर्षण होतं.



1937 मध्ये मनोबिनासारख्या सुविद्य , प्रगल्भ पत्नीमुळे त्यांच्या जीवनात नवीन पर्व सुरू झालं. बीमलदांना आता स्वतंत्रपणे काम करण्याची इच्छा होती. तशी संधी चालून आली. त्यांनी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट एक सप्टेंबर 1944 रोजी 'चित्रा' सिनेमा गृहात प्रदर्शित झाला. 'उदयेर पाथे' नवसिनेमाचा, नवविचारांचा संदेश घेऊन आला. बंगाली तरुणांत त्यांची खूप चर्चा होई. 'उदयेर पाथे' च्या हिंदी आवृत्तीच्या - हमराहीच्या निमित्तानं बिमलदा प्रथमच मुंबईत आले. पण काही काळ कोलकात्यात अस्थिर वातावरणात काढल्यानंतर ते मुंबईस राहायला आले. शाळेतल्या मित्राने हितेश चौधरीने त्यांना मुंबईत आणलं. येताना ऋषिकेश मुखर्जी, असीत सेन, नझीर हुसेन अशी गुणी माणसंहि त्यांच्याबरोबर होती. हितेन चौधरी यांनी ' माँ' चित्रपटाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. माँ चांगला चालला. देविकारणीच्या बंगल्यात बिमलदांचे वास्तव्य होते. मनोबीना सर्वांची - सहकारयांची जातीनं देखभाल करीत . त्यातूनच 'बिमल रॉय प्रॉडक्शन' उभे राहिले. सलील चौधरी ' रिक्षावाला' ही त्यांची कथा घेऊन आले आणि ' दो बिघा जमीन' ही अजोड कलाकृती प्रेक्षकांसमोर आली. बलराज साहनी यांनी शंभू महातो या गरीब शेतकऱ्याची अविस्मरणीय भूमिका केली आणि हिंदी चित्रपट सृष्टीत बंगाली खादीचा पेहराव घातलेले मितभाषी बिमल रॉय दाखल झाले. त्याच सुमारास 1953 मध्ये त्यांनी दिग्दर्शित केलेला 'परिणिता' आला आणि बिमलदांनी अनेक पारितोषिक जिंकली. चित्रपटाच्या इतिहासात बिमल रॉय युग सुरू झाले. 'देवदास', 'मधुमती', 'बंदिनी', ' सुजाता', 'परख' मधून बिमलदांनी वास्तवता, जीवनाचे गहिरे रंग, व्यक्तिरेखा, निसर्ग, संगीत यांचे रंग भरले. त्यांच्या आवडत्या शरच्चंद्र यांच्या कादंबऱ्यांवर हळुवारपणे 'बिराज बहु' , देवदास, परिणिता सारखे चित्रपट केले. त्यांचे सहकारी, चाहते, मित्र असलेले ऋषिकेश मुखर्जी , असीत सेन, बासू भट्टाचार्य आदी दिग्दर्शकांनी बिमल रॉय स्कूलची परंपरा पुढे चालू ठेवली. संयत अभिनय, वास्तवता, आणि कलात्मकता यांचं भान बिमलदांची देणगी आहे. अविश्रांत काम करणाऱ्या बिमलदांना अर्ध्या वाटेत फुफ्फुसाच्या कर्करोगाने गाठलं. डोक्यावर कर्जाचा डोंगर होता. पण युनिटमध्ये कुणीही विनावेतन राहिलं नाही. वांद्र्याच्या 'गोदीवाला' बंगल्यात अखेरपर्यंत भाडेकरू म्हणून राहिले. 8 जानेवारी 1966 रोजी बिमलदांनी अखेरचा श्वास घेतला.


# पुस्तक: 'महर्षी वाल्मिकी' लेखक - विश्वास विष्णू देशपांडे

आधुनिक केसरी

**विश्वास सरांनी लिहिलेले आणि सोहम क्रिएशन अँड पब्लिकेशन, पुणे द्वारे नुकतेच प्रकाशित झालेले त्यांचे पुस्तक 'वाल्मिकी' वाचले. पुस्तकाचे नितांतसुंदर मुखपृष्ठ बघताक्षणी पुस्तक वाचायची अशी काही ओढ लागली की, ते पूर्ण केल्यावाचून गत्यंतर नव्हते. वाल्मिकी म्हणजे रामायणाचे जनक, इतक्या जुजबी माहितीच्या पार्श्वभूमीवर सुरुवात केली अन, पुस्तक वाचल्यावर मात्र जाणवले की युगानुयुगे रामायणाचे पठण, मनन आणि चिंतन करावयास प्रेरणा देणाऱ्या या आद्य महाकवींबद्दल आपले ज्ञान फारच तोकडे आहे. म्हणूनच महर्षी वाल्मिकींविषयी सखोल, उद्बोधक आणि विश्वासार्ह्य माहिती देणारे हे पुस्तक अतिशय महत्वपूर्ण आहे!**

या पुस्तकाचे प्रमुख वैशिष्ठ्य म्हणजे त्याचे सुंदर सादरीकरण. सरांची खासियत असणारी ओघवती, साधी, सरळ अन सोपी भाषा या पुस्तकात देखील कायम आहे. विषयवस्तू मांडण्याची हातोटी अतिशय उत्तम! यात मुख्यत्वेकरून आहे वाल्मिकींचा प्रथम परिचय. चित्रपटासारख्या फ्लॅशबॅक तंत्राने रत्नाकराचा करून दिलेला परिचय मला खूप भावला. कथानकातील औत्सुक्य कायम ठेवतानाच, रामकथेचा थोडक्यात पण सर्वांगसुंदर आढावा देखील यथोचित ठिकाणी घेण्यात आलेला आहे. वाल्मिकींची सप्तर्षींशी भेट, त्यांचे आपसातील संवाद, नारदाशी आणि ब्रह्मदेवाशी भेट, या प्रसंगांचे भावपूर्ण वर्णन तर अतिसुंदर आणि मार्मिक! तसेच रत्नाकराचे त्याच्या पत्नी आणि मुलासोबतचे घरगुती वातावरणातील सहज संवाद देखील प्रसंगांच्या ओघाओघाने आल्यामुळे छान जमलेत.

विश्वास सरांनी वाल्ह्याचा वाल्मिकी होतांनाची स्थित्यंतरे प्रभावीपणे साकारली आहेत. हा जो स्थित्यंतराचा अलौकिक आणि प्रेरणादायी प्रवास आहे ना, तोच या पुस्तकाचा मानबिंदू, माझ्या मते! इथे अधोरेखित झालेला 'रामाच्या मानव्यावरून देवत्वाकडे झालेला प्रवास' व वाल्ह्याच्या 'आदिमानव्याकडून ऋषित्वाकडे होत गेलेला प्रवास' खूप परिणामकारक वाटला. वाल्ह्या अन वाल्मिकी शब्दांचा अर्थ प्रथमच या पुस्तकातून आज कळला. शिकारी, आढ्यतेखोर आदिमानव, हताश पती आणि पिता, तपोबलाने झालेला महर्षी, सीतेचा मानस पिता, लवकुश आणि इतर शिष्यांचा आदर्श गुरु, लवकुशांना क्षात्रधर्मानुसार सर्वांगीण शिक्षण देऊन महापराक्रमी बनवणारे वाल्मिकी महर्षी, ही वाल्मिकींची विविधरंगी रूपे अतिशय मनोहर आणि परिणाम साधणारी आहेत. या लवकुश नामक दोन रामपुत्रांचा पराक्रम काय वर्णावा, रामाचे सैन्य, रामाचे तिन्ही बंधू, भरत, लक्ष्मण आणि शत्रुघ्न, तसेच हनुमानाला देखील अस्मान दाखवणारे हे महापराक्रमी बालक रामपुत्र म्हणून शोभले, कारण ते महर्षी वाल्मिकींचे शिष्य होते. त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात सर्वात मोठा वाटा त्यांच्या तेजोनिधी गुरूंचा अर्थात वाल्मिकींचा! याशिवाय या घटनेने लक्ष्मण आणि हनुमानाचा लंकाविजयाने उत्पन्न झालेला गर्व देखील नाहीसा झाला.



वाल्मिकींचे सर्वात वंदनीय आणि पूजनीय असे सर्वात महत्वाचे स्वरूप म्हणजे एका आद्यकवीचे! अजरामर अशा महाकाव्याचा प्रणेता महाकवी वाल्मिकी! सर्वकालीन, सर्वमान्य आणि सर्वपूज्य अशा पवित्र वाल्मिकी रामायणातील चांगल्या वाईट पात्रांत अक्षरशः प्राण ओतणाऱ्या व्यक्तिरेखा आपल्या चोवीस हजार गेय श्लोकात शब्दबद्ध करणारा हा अतुलनीय महाकवी! वाल्मिकींना ब्रह्मदेवाच्या कृपेने दिव्यदृष्टी लाभली, पण रामकथेला काव्यबद्ध आणि भावबद्ध करण्याची वाल्मिकींची विलक्षण प्रतिभा असल्यामुळेच हे अजरामर काव्य निर्माण झाले. त्यांची साहित्यनिर्मितीची अत्युत्तम जाण आणि प्रज्ञा वादातीत आहेच, पण त्यांचे इतर गुण विश्वास सरांनी फार सुंदररित्या विशद केलेत ( भविष्यवेत्ता, दार्शनिक, तत्वज्ञ, तसेच समाजशात्र, भूगोल, इतिहास, अंतराळ, तारामंडळ इत्यादींचा गाढ अभ्यासक ) मंडळी, वाल्मिकींचे हे सर्व गुणनिधान पुस्तक वाचल्यावर ध्यानात आलेत. या पुस्तकातून मला व्यक्तिगतरीत्या सर्वात भावलेला वाल्मिकी म्हणजे मानवी मनाचा सखोल अभ्यासक आणि मानवी भावभावनांचा उहापोह करून काव्यात ते सजीव चित्रण करणारा असा विलक्षण लेखक! भावप्रवण लेखन करतांनाच त्याच्यामधील समाजप्रबोधन करणारा ज्ञानी, धर्मज्ञ आणि कर्मज्ञ असा महापुरुष देखील मला प्रकर्षाने जाणवला तो या पुस्तकातूनच! बोनस म्हणता येईल अशी वाल्मीकींच्या वास्तव्याची, आश्रमांची आणि समाधीची इतिहासकालीन आणि भौगोलिक विश्वसनीय माहिती देखील विश्वास सरांनी संदर्भासहित दिलेली आहे, या अनुषंगाने सरांनी 'वाल्मीकी' या विषयाचा किती सांगोपांग अभ्यास केला आहे हे दिसते!

'प्रथम तुज पाहता, जीव वेडावला' असे कांहीसे या पुस्तकाच्या मुखपृष्ठदर्शनापासून तर मलपृष्ठापर्यंत झाले, अन पुस्तक लहान पण अर्थगर्भ आणि भावगर्भ असल्याने एकाच बैठकीत अधाशासारखे वाचले. अर्थात वारंवार वाचावे, संग्रही ठेवावे, इतरांना भेट द्यावे आणि महत्वाचे म्हणजे वाल्मिकींसारख्या आदर्श गुरु आणि कवीच्या चरित्रातून तसेच त्यांनी रचलेल्या महाकाव्य अर्थात रामायणातून इतके कांही घेण्यासारखे आहे की 'घेता किती घेशील दो कराने' अशी माझी अवस्था झालेली आहे. वाल्ह्याच्या शरीराभोवती साचलेल्या वारुळासारखे षड्रिपूंचे एकावर एक असे थर आपल्या देह, मन आणि बुद्धीवर जमत आहेत. त्यांना भेदायला रामनामाचेच तंत्र आणि मंत्र विकसित करावे लागणार आहे. याकरता महाकवी वाल्मिकींहून अधिक प्रभावशाली आदर्श कोण असेल ?

विश्वास सर, हे पुस्तक लिहितांना आणि त्याविषयी माहिती गोळा करतांना आपण किती कठोर मेहनत घेतली आहे हे पुस्तकाच्या शब्दाशब्दात प्रकट होत होते. पुस्तकाचा आकार लहान असला तरी त्याची व्याप्ती अनंत आणि असीम आहे, कारण या पुस्तकात आपली नितांत रामभक्ती सामावलेली आहे! रामकृपेने आपण असेच समृद्ध लेखन करीत राहणार यात दुमत नाहीच, कारण आपण श्रीशारदादेवीचे परम उपासक आहात! प्रभू श्रीराम आपल्या सर्वांवर असेच कृपेचे छत्र धरून आपले कायम रक्षण करोत हीच रामप्रभूच्या चरणी प्रार्थना!!!

विश्वास सर, आपल्या या सर्वांगसुंदर पुस्तकलेखनासाठी मनःपूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा! आपल्या आधीच्या साहित्याप्रमाणेच या पुस्तकाला देखील वाचकांचा भरभरून प्रतिसाद मिळेल याबद्दल संपूर्ण विश्वास आहे! धन्यवाद!

**डॉ. मीना श्रीवास्तव, ठाणे भ्रमणध्वनी- ९९२०१६७२११**



# भवताली असावीत माणसं

आधुनिक केसरी

**नव्या वर्षांच्या आरंभी न चुकता आपण भराभर आणि भाराभर संकल्प करून मोकळे होत असतो आणि उत्साहाचा भर ओसरून गेल्यावर मात्र केलेले संकल्प सहजपणे विसरून जातो, हे विस्मरण चुकांवर पांघरुण घालणारे असते म्हणून ते अंगाभवती घट्ट लपेटून घेत आपण याकडे दुर्लक्ष करीत असतो.**

कुणी काय संकल्प करायचा असतो" ही गोष्ट व्यक्तीपरत्वे वेगवेगळी असते, असे असले तरी संकल्प हे केले जातात." यातले किती पूर्ण होतात ? किती अधुरे राहतात " हा स्वतंत्र विषय आहे. यात आणखी गमतीचा भाग लक्षात घेण्यासारखा आहे, तो म्हणजे संकल्प करून तो मोडण्यात मजा असते, असे मानणारे महाभाग आहेत. एक सोपा संकल्प आहे, पण सध्याच्या वातवरणात आचरणात आणावयास सोपा राहिलेला नाहीये. हा संकल्प आहे माणसं जमवून गप्पांची मैफल जिथे रंगली आहे, त्यात सहभागी होण्याची मानसिक तयारी करणे.

आपल्याभवती माणसे असणे यासारखे सहवास-सुख नाहीये मित्रांनो, आजच्या जेष्ठ पिढीने हे सहवास-सुख" मनमुरादपणे अनुभवले आहे. ऑफिसमधल्या गप्पा, टी-टाईम मधल्या गप्पा, ओट्यावरच्या गप्पा, गच्चीवरच्या गप्पा, थंडीच्या दिवसायल्या शेकोटी भवतीच्या उबदार गप्पा, रस्त्यात सायकल, स्कुटर, थांबवून , टपरीवर सिगारेटचे धुराडे सोडीत केलेल्या गप्पा", किती उदाहरणे द्यावीत"भवताली माणसे असताना अनुभवलेले बोलके-क्षण" आठवणीत कायम घर करून राहिलेले आहेत. कार्य-प्रसंगांच्या निमित्ताने अनेकांच्या भेटी होतात, काही नियमित भेटणारे , अधून-मधून-भेटणारे तर काही जण खूप दिवसांनी भेटतात, अशा भेटीत खुप जुन्या आठवणी निघतात, आपल्या आठवणीतल्या माणसांची विस्मृतीत गेलेल्या माणसांची आठवणीना उजाळा दिला जातो.

सुखाचे क्षण आनंद वाढवणारे , दुखांचे प्रसंग सांगुन आपले मन हलके केल्याचे समाधान मिळते.. भवताली आपल्या माणसांचा हा असा सहवास "मनाला नवा तजेला देणारा असतो", त्यासाठी आपण माणसांच्या सहवासात रमण्यास शिकले पाहिजे.तरच मरगळलेल्या मनाला पुन्हा टवटवीत ठेवु शकणारे स्नेह-टॉनिक आपण देऊ शकुत. नववर्षात आपल्या मनासाठी हा आरोग्यदायी असा हमखास गुणकारी ऊपाय करूया.

अरुण वि.देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# शरीरावर येणारी सूज व उपाय

आधुनिक केसरी

चांगले शुद्ध लोणि व दूध घेऊन यात थोडे तिळ वाटुन हा लेप सूज आलेल्या जागेवर लावल्यास सूज ओसरते. हिरडे, हळद, भारंगी, गुळवेल, दारू हळद, पुनर्नवा, देवदारू, व सुंठ हे समप्रमाणात घेऊन एक लिटर पाण्यात टाकून अर्ध होईपर्यंत उकळून घ्या. मग हा.. पथ्यादी काढा. जेवणानंतर घ्या. शरीरातील कोणत्याही प्रकारची सूज तात्काळ उतरते... सुंठ व पिंपळि चूर्ण गुळात मिसळून खाल्ल्यानं कोणत्याही प्रकारची सूज उतरते.. (3) एरंड मूळ, आक वनस्पती चे मुळ, पुनर्नवा व कडुलिंबाचि साल हे सर्व एकत्र उकळून हे जीथे सूज आहे तिथे लावल्यास सर्वांग सूज ओसरते. गुळ व अद्रक, गुळ व सुंठ, गुळ व हिरडे, गुळ व पिंपळि. या पैकी काही रोज नियमितपणे खाल्ल्यानं शरीरावर येणारी सूज उतरते.. पुनर्नवा, देवदारू, सुंठ, शेवगा साल, व मोहरी हे एकत्र वाटून याचा लेप तीथे लावावा लगेच सूज उतरते. गोमूत्र थोडे गरम करून सूजेवर लावत राहा. हातपाय, चेहरा, पोटरी कुठे ही सूज आली असेल तर ती तात्काळ उतरते. बेलाचे मुळ, त्रिकुट, पिंपरी, हे समप्रमाणात घेऊन दुधात आटवून मग थोडं थोडं घ्या. याने सूज उतरते. चिमूटभर शुद्ध गुगुळ हे गोमूत्र सोबत घेतल्यास सूज उतरते.



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

## संतश्रेष्ठ जाज्वल्य व्यक्तिमत्व: दासगणू महाराज!

आधुनिक केसरी

**महत कल्याणकारी व जगाला वरदायी झालेल्या दासगणू महाराजांचे जीवन आपल्या सामान्य लोकांसाठी अमृत आहे. श्री साईबाबांचे कथामृत एकही कथा त्यांचे चरित्र सांगितल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. साईबाबांचे जीवनचरीत्र देशविदेशात पोहचविण्यासाठी त्यांचे अतुलनीय योगदान आहे. त्यांचे ग्रंथकार्य साई चरित्र, श्री गजाननविजय व इतर विस्तृत वाङ्मय पाहता दासगणू महाराजांची जयंती व पुण्यतिथी साजरी करणे, हे प्रत्येक साईभक्ताचे कर्तव्यच ठरते. असा हा बापू- श्रीकृष्णदास निरंकारीजींचा माहितीपूर्ण व ज्ञानवर्धक लेख..**

दासगणू महाराज हे श्री साईबाबा यांचे परमभक्त होते. साईबाबांच्या स्फूर्तीनेच त्यांनी ओवीबद्ध रचना करण्यास सुरुवात केली. त्यांच्या अभंगस्वरूप लेखनात साईबाबांचा उल्लेख सतत येतो. गणू म्हणे ही त्यांची नाममुद्रा होती. ते साईबाबांनाचा ब्रह्मा-विष्णू-महेशांच्या रूपात पाहत. दासगणू महाराज हेच साईबाबा संस्थानचे पहिले अध्यक्ष होते. त्यांच्या प्रमुख रचना व ग्रंथसंपदा अशा आहेत- १) श्री आऊबाई चरित्र २) ईशावास्य भावार्थ बोधिनी ३) श्री गजानन विजयः या ग्रंथामधे श्री.गजानन महाराजांचे चरित्र त्यांनी लिहून ठेवले आहे. हे ग्रंथही महाराष्ट्रात खूप लोकप्रिय आहेत. ४) भक्त लीलामृत ५) भक्तिसारामृत ६) भाव दीपिका ७) शंकराचार्य चरित्र ८) संत कथामृत ९) श्री साईनाथ स्तवनमंजिरी १०) शिर्डी माझे पंढरपुर- साईबाबांची आरती. इतर १०० स्फुटपदे, उपदेश प्रकरणात शिष्यबोध व छात्रबोध हे दोन ग्रंथ आहेत. याव्यतिरीक्त अमृतानुभव, शांडिल्य सुत्र, नारद भक्तीसुत्र, भक्ती रसायन, चांगदेव पासष्टी, ईशावास्य, विष्णु सहस्रनाम बोधिनी, गौडपाद कारिका विवरण, विचारसागर प्रदिप यासारखे टिकाग्रंथ व १२५ बोधकथाही लिहील्या आहेत.

गणेश दत्तात्रेय सहस्रबुद्धे ऊर्फ दासगणू महाराज हे मराठी संत, कवी, ग्रंथकार व कीर्तनकार होते. त्यांनी मोठ्या प्रमाणात केलेल्या संत चरित्रलेखनामुळे त्यांना आधुनिक महाराष्ट्राचे महीपती म्हणून ओळखतात. त्यांचा जन्म पौष शु.११ शके १७८९ म्हणजेच दि.६ जानेवारी १८६८ रोजी अकोळनेर, ता.जि. अहमदनगर या गावी झाला. त्यांचा विवाह जामखेड तालुक्यात बोरले आष्टी येथील जहांगिरदार नारायण रानडे यांची कन्या सरस्वती यांच्याशी सन १८९२मध्ये झाला. सन १८९३मध्ये ते पोलीस खात्यात भरती झाले आणि सन १९०४पर्यंत ती नोकरी केली. ते पोलीसखात्यात नोकरीला असले तरी त्यांच्या ओढा मात्र परमार्थाकडेच होता. या दरम्यानच त्यांच्यावर त्या काळचा कुख्यात गुंड कान्हा भिल्ल याला पकडण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती. जेव्हा त्या गुंडाला ही बातमी कळाली, तेव्हा त्याने महाराजांना जीवे मारण्याचे ठरविले. पण महाराज यातून सहीसलामत सुटले. तेव्हापासून त्यांची अशी धारणा झाली की ईश्वरानेच आपल्याला वाचविले. मग त्यांनी संपूर्ण जीवन ईश्वरचरणी अर्पण करण्याचे ठरविले. त्यांचे पहिले कीर्तन इ.स.१८९७ साली जामखेडच्या श्रीविठ्ठल मंदिरात झाले. त्यांनी श्री साईनाथ स्तवनमंजिरी या स्तोत्राची निर्मिती दि.९ सप्टेंबर १९१८ रोजी मध्य प्रदेशातील श्री माहेश्वर या क्षेत्री साईबाबांचे महानिर्वाणाअगोदर ३७ दिवसांपूर्वी केली. साईबाबा संस्थानची स्थापना सन १९२२साली झाली आणि पहिले अध्यक्ष म्हणून दासगणू महारांजाची निवड केली गेली. तेथून पुढे सन १९४५पर्यंत त्यांनी अध्यक्षपद सांभाळले. श्री दासगणू महाराजांनी ईशावास्य उपनिषद भाषांतराचे कार्य सुरु केले आणि ते अडले या पहिल्याच श्लोकापाशी-

"ईशावास्यमिदं सर्वं यत्किंचीत जगत्यां जगत।
तेन त्यक्तेन भुञ्जिथा मा गृधः कस्यस्विद्धनम।।"

अर्थात- या चराचरात जे म्हणून काही आहे, म्हटल्याने दिसते, भासते, जाणवते ते सारे ईश्वराने व्यापलेले आहे. त्या सर्वाचा त्यागपूर्वक भोग घ्यावा. दुसरी कोणतीही अपेक्षा ठेवू नये. महाराज त्यागपूर्वक भोग घ्यावा, या शब्दांपाशी अडले. त्यागाने भोग तरी कसे शक्य आहे? असे त्यांना वाटले. भल्या भल्या विद्वानांशी चर्चा करूनही अर्थ उकलेना. शेवटी त्यांनी शिर्डी गाठली आणि श्री साईबाबांनाच प्रार्थना करून त्या श्लोकाचा अर्थ विचारला. त्यावर बाबा हसून म्हणाले, "अरे हा अर्थ तर तुला काका दीक्षितच्या घरची मोलकरीण सांगेल!" श्री दासगणूनाच नव्हे तर हे उत्तर ऐकणाऱ्या सर्वांनाच आश्चर्य वाटले. त्या बिचारीचे शिक्षण ते किती? बुद्धी ती काय? ती उपनिषदांची अर्थ-व्युत्पत्ती कशी काय करणार? मग दासगणू महाराज काकासाहेबांच्या घरी गेले. रात्री श्री साईबाबांविषयी गप्पा झाल्या. त्या स्मरण रंजणातच ते झोपी गेले. ते दिवाळीचे दिवस होते. पहाटेच त्यांना जाग आली ती कुणाच्या तरी मधुर गुणगुणण्याने! आधीच दिवाळीची प्रसन्न पहाट त्यात हा सुश्राव्य स्वर!! दासगणू महाराज जाऊन बघतात, तो काय? भांडी घासण्यात दंग असलेली काकांची मोलकरीण गाणे गुणगुणत होती. ती पोर अंगावर फाटके लुगडे नेसली होती आणि गात होती, नारिंगी रंगाच्या साडीची महती सांगणारे ते गाणे! त्या साडीची भरजरी नक्षी, तिचे काठ, तीचा पदर यांचे भरभरून वर्णन त्यात होते. दिवाळीच्या आनंदात माखलेल्या काकांच्या घरातल्या पोरीबाळी नव्या कपड्यात नटल्या होत्या. त्यांना पाहून फाटक्या कपड्यातली ती पोर उदासपणे नारिंगी साडीचे गोडवे गाणारे ते गाणे गुणगुणत होती. महाराजांचे मन या दृष्याने हेलावले. ते काकांना म्हणाले," अहो काका, या पोरीला सुद्धा एखादी नवी साडी घेऊन द्या. काकासुद्धा मुळात उदार हृदयाचे त्यात महाराजांची विनंती! तेव्हा आनंदाने ते घरांत गेले. दिवाळीच्या खरेदी निमित्त कपाटात आणखीही काही नव्या साड्या होत्या. त्यातली एक सुंदरशी साडी त्यांनी या पोरीला भेट म्हणून दिली. नवी साडी नेसून संध्याकाळी मैत्रिणींसोबत ती पोर फिरली आणि बागडली देखील. दुसऱ्या दिवशी ती आली मात्र जुनी साडी नेसूनच. नवी साडी घरी ठेवून. पण चेहऱ्यावर कालची उदासीनता नावालाही नव्हती. उलट आनंद विलसत होता. काल अंगावर जुनी साडी आणि चेहऱ्यावर उदासीनता होती. आजही अंगावर जुनीच साडी, मात्र चेहऱ्यावर आनंद! तिचं हे रूप पाहताच दासगणू महाराजांच्या हृदयांतरी श्लोक निनादला-



"ईशावास्यमिदं सर्वं यत्किंचीत जगत्यां जगत।
तेन त्यक्तेन भुञ्जिथा मा गृधः कस्यस्विद्धनम।।"

या मोलकरणीच्या निमित्ताने महाराजांना त्यागपूर्वक भोगचा अर्थ उमगला. आज ती नवी साडी नेसली नव्हती तरी कालचे दैन्य ओसरले होते. ते केवळ भावना बदलल्याने! आज मनाने ती खिन्न नव्हती कारण साडीची उणीव नव्हती. प्रथम नवे लुगडे घ्यायला असमर्थ होती, म्हणून नाईलाजाने जुनेच लुगडे नेसून उदास होती. मग नवे लुगडे मिळाले, ते नेसण्यास समर्थ होती. तरीही जुनेच नेसायचे तिने मनाशी ठरवले, त्यामुळे ती मनाने उदास नव्हती. समर्थ असूनही दैन्य मिरवीत होती. केवळ नाही नाही, आणि आहे नाही, या भावनांच्या गुणांनेच माणूस सुख आणि दुःख भोगतो. प्रत्यक्षात सुख आणि दुःखाचे मोजमाप बाह्यांगावरून करता येत नाही. सर्व जर काही एकाच ईश्वराने व्यापले आहे, तर त्यात सुख आणि दुःख आले कोठून? नवी साडी नसल्याची अपूर्णता दुःखाचे कारण होती. साडी लाभल्याची पूर्णता हे सुखाचे कारण बनले. फरक बाह्यात पडला नाही, आंतरिक होता. थोडक्यात सुख आणि दुःख हे आंतरिक आहे. प्रत्यक्षात सारे काही पूर्णच आहे. फाटकी साडी नेसलेली ती पोर ईश्वराचेच अंश होते. दाता म्हणजे काका आणि त्यांनी दिलेले दानही ईश्वरी अंशच. मग सारे काही अशेषच! ईश्वरावाचून वेगळे काहीच नाही. केवळ मी पणाने आंतरिक सुख-दुःख आहे. मीपणामुळे मी देणारा, मी घेणारा, मी अभावग्रस्त असा भाव आहे. प्रत्यक्षात दाता, देय, दान सारे काही ईश्वरी सत्तेतच सामावलेले आहे. अशा राज्य महीपती दासगणू महाराजांचे महानिर्वाण श्रीज्ञानेश्वर महाराज पुण्यतिथीला- कार्तिक वद्य १३ शके १८८३ म्हणजेच दि.२६ नोव्हेंबर १९६२ रोजी पंढरपुरात झाले.

## राजवाडे युग आणि महाराष्ट्रातील इतिहास मीमांसा

आधुनिक केसरी

*(मागील अंकावरून)*

**४) बखरींचा शोध व संपादन :** अ) 'राधामाधव विलास चंपू' व 'महिकावतीची बखर' हे दोन दुर्मिळ ग्रंथ काटेकोरपणे संपादन करून १९२२ व १९२४ मध्ये प्रकाशित केले. प्रामुख्याने छ. शहाजी महाराज यांचे चरित्र सांगणारे हे चंपूकाव्य जयराम पिंड्ये या संस्कृत कवीने लिहिले होते. १६५३-५८ या दरम्यान हे काव्य रचले असावे असे वि. का. राजवाडे यांचे मत आहे. तत्कालीन समाज संस्था आणि लोकशिक्षणाचे चित्रण या काव्यातून घडते. छत्रपती शहाजीराजे भोसले यांच्या चरित्रातील काही मत्त्वाचे पैलू या काव्याच्या माध्यमातून उलगडण्यात आले आहेत. मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास करताना संस्कृत भाषेतील समृद्ध साधनांकडे वि. का. राजवाडे यांनी प्रथमतः लक्ष वेधले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या कारकीर्दितील संस्कृत साहित्याचा अभ्याससुद्धा साधन म्हणून महत्त्वाचा आहे हे संशोधकांच्या लक्षात आले. अशाप्रकारे मराठ्यांच्या इतिहासातील एका उपेक्षित दालनाकडे वि. का. राजवाडे यांनी या माध्यमातून लक्ष वेधले.

ब) महिकावतीची बखर : 'बक्' बोलणे-बकणे या शब्दापासून 'बखर' हा शब्द आला असावा. प्रथम 'तोंडी इतिहास' व नंतर 'लेखी इतिहास' हा शब्द लावण्यात आला.' गतकालीन इतिहासाचा उलगडा करण्याचे 'बखर' हे एक महत्त्वाचे साधन होय. महाराष्ट्रातील प्रमुख बखरींमध्ये 'महिकावतीची बखर' हे एक महत्त्वाचे साधन होय. 'महिकावतीची बखर' ही १५-१६व्या शतकामध्ये लिहिली गेली. ती भगवान दत्तांच्या प्रेरणेने केशवाचार्य यांनी लिहिल्याचे सांगितले जाते. बहामनी राजवटीच्या काळात मराठी भाषिक प्रजेवर झालेल्या असंख्य अत्याचारांच्या विरोधात लोकांना संघटीत करण्याचे प्रयत्न या बखरीमध्ये प्रकट होतात. मुंबई-ठाणे परिसरातील १६८ ठिकाणांची माहिती या बखरीतून प्राप्त होते. वि. का. राजवाडे यांनी संपादन केलेल्या 'महिकावतीची बखरी'च्या १९२९ व १९९१ अशा दोन आवृत्त्या निघाल्या आहेत. यातील १०८ पानांचा आशय असून त्यात ११० पानी प्रस्तावना लिहिली आहे. पालघरजवळ महिकावतीच्या देवीचे स्थान आहे. ई.स. ११३८ ते पोर्तुगीज काळापर्यंतचा इतिहास या बखरीत प्रकटतो. साष्टी म्हणजे मुंबई, पालघर, वसई या भागातील ६० पेक्षा अधिक बेटांचा इतिहास या बखरीमध्ये प्रकट होतो. १५व्या शतकातील मुंबईचा भौगोलिक व सांस्कृतिक इतिहास या बखरीमध्ये प्रकटला आहे. घटनाचित्रे व स्थळचित्रे हे पैलू येथे लक्षणीयरित्या प्रकटले आहेत. या बखरीतील १२००० शब्दांपैकी फक्त १०३ परकीय शब्द राजवाडे यांना आढळले. उत्तर कोकणातील ३०६ गावांची माहिती यात आली आहे. सन ११३८ ते १५७२ पर्यंतचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास या बखरीमध्ये आला आहे. शिवपूर्व काळातील तीन प्रमुख बखरींपैकी 'महिकावतीची बखर' महत्त्वाची असून ती उत्तर कोकणातील समाज व संस्कृती समजावून घेण्यास उपयुक्त ठरते. या बखरीचा समाजशास्त्रीयदृष्टीने अभ्यास आवश्यक आहे. मुंबईचा इतिहास पोर्तुगीजांच्या आगमानापासून सुरू होता असा एक चुकीचा प्रवाह रूढ होता. परंतु राजवाडे यांनी 'महिकावतीची बखर' प्रकाशित केल्यानंतर हा सिद्धांत फोल ठरला आणि यादव काळ, बहामनी काळ या मध्ययुगात सुद्धा मुंबई परिसरातील ऐतिहासिक प्रगतीचा आलेख सलगपणे शोधता येतो हे राजवाडे यांनी सिद्ध केले. मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी देणारे पूरक संदर्भसाहित्य वि. का. राजवाडे यांनी उपलब्ध केले त्यामुळे बखरीतील सामुग्रीकडे चिकित्सकपणे कसे पाहावे याची संशोधकांना जाणीव होऊ लागली. या बखरीची वि. का. राजवाडे यांनी लिहिलेली प्रस्तावना त्यांच्या ठोस आणि भक्कम संशोधकदृष्टीचे प्रतिबिंब म्हटली पाहिजे.





**५) मराठ्यांच्या इतिहासाची साधने :** वि. का. राजवाडे यांच्या जीवनाकार्याचे यशशीखर म्हणजे त्यांनी संकलीत केलेली आणि प्रकाशित केलेली 'मराठ्यांच्या इतिहासची साधने' म्हटली पाहिजे. सन १८९८ ते १९९७ या काळात 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' त्यांनी २२ खंडांतून प्रकाशित केली. त्यापैकी ९ खंडात त्यांनी सविस्तर विवेचक प्रस्तावना लिहिल्या. त्यातून त्यांची इतिहासदृष्टी प्रकट होते. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' हे वि. का. राजवाडे यांनी संपादन केलेले ग्रंथ म्हणजे त्यांचे महाराष्ट्राच्या तेजस्वी इतिहासपर्वावर प्रकाश टाकणाऱ्या कागदपत्रांची मौलीक उपलब्धता होय. राजवाडे यांनी गावोगावी प्रवास करून कष्टपूर्वक प्राप्त केलेली कागदपत्रे व त्यांचे प्रकाशन या संदर्भात त्यांचे कार्य इतिहासाला कलाटणी देणारे ठरले. जुन्या कागदपत्रांचे शोधकार्य अत्यंत जीकिरीचे असते. ही कागदपत्रे मिळविल्यानंतर त्यांचे लिप्यंतर, वाचन आणि विश्लेषण हे टप्पे महत्त्वाचे असतात. यादृष्टीने वि. का. राजवाडे यांनी कागदपत्रांचे संकलन, संपादन व प्रकाशन करण्यामध्ये दाखविलेली हातोटी आणि त्यांचे परिश्रम पाहता आधुनिक महाराष्ट्रास त्यांनी दिलेली ही सांस्कृतिक देणगी म्हटली पाहिजे.

वि. का. राजवाडे यांच्या युगप्रवर्तक कार्याचे यथार्थ विश्लेषण करताना, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी भारतीय इतिहास शास्त्रामध्ये मूलभूत सिद्धांत मांडले. 'मूळ कागदपत्रे ही इतिहास लेखनात मौलिक दस्तऐवज ठरतात.' "NO DOCUMENT, NO HISTORY" हे त्यांचे जणू सूत्रच होते. कागदपत्रांचे संकलन, संपादन व प्रकाशन ही एक शास्त्रीय प्रक्रीया आहे आणि ही प्रक्रिया राजवाडे यांनी अत्यंत काटेकोरपणे कृतीत आणली. राजवाडे यांच्या विवेचक प्रस्तावना ह्या सत्यशोधन करणाऱ्या आहेत. आणि तेवढ्याच दिशादर्शक सुद्धा आहेत... इतिहासापासून भावी पिढीने कोणता बोध घ्यावा, ऐतिहासिक सत्य वर्तमानास कसे दिशादर्शक ठरू शकते याबाबत त्यांनी केलेले मार्गदर्शन हे निश्चित त्यांच्या ऐतिहासिक दृष्टीचे द्योतक म्हटले पाहिजे. अर्नोल्ड टॉयन्बी यांनी श्रेष्ठ संस्कृती कनिष्ट संस्कृतीवर मात करते असे प्रतिसाद व आव्हान सिद्धांतामध्ये म्हटले आहे. वि. का. राजवाडे यांनी त्यांच्या अगोदर ५० वर्षे 'जशी संस्कृती तसे हत्यार' असे सूत्र मांडले होते. वि. का. राजवाडे यांच्या दूरदृष्टीचे आणि विलक्षण प्रतिभाशक्तीचे प्रतिबिंब त्यांनी केलेल्या विष्लेषणातून प्रकट होते.

डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी म्हटल्याप्रमाणे, 'मराठ्यांच्या इतिहासाची कागदपत्रे' प्रकाशित करून वि. का. राजवाडे यांनी इतिहासाच्या अभ्यासकामी नवे दालन उपलब्ध करून दिले. वि. का. राजवाडे यांनी इतिहासाला पोषक अशा साधनसामुग्रीचे प्रकाशन करून महाराष्ट्रातील संशोधकांना अध्ययन आणि संशोधनासाठी विपुल अशी सामुग्री उपलब्ध करून दिली. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, वा. सी. बेंद्रे, ग.ह.खरे इ. संशोधकांनी पुढे चालून त्यांची परंपरा निष्ठेने चालविली. दत्तो वामन पोतदार यांनी 'केसरी'तून लिहिलेल्या लेखात राजवाडे यांच्या संशोधन कार्याचे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप स्पष्ट केले. तसेच राजवाडे यांच्या संशोधन पद्धतीतील शिस्त, विश्लेषण पद्धती आणि सैद्धांतिक बैठक याबाबत नवा प्रकाश टाकला.

**६) समारोप :** वि. का. राजवाडे यांनी भारतीय इतिहासमीमांसेत नवे युग निर्माण केले. त्यांचे विचारविश्व हे प्रखर बुद्धिवाद आणि तर्कशुद्ध मीमांसेवर आधारलेले होते." त्यांच्या लेखनातील विविधता, सखोलता आणि प्रतिभासंपन्नता ही त्यांच्या इतिहासमीमांसेची बैठक होती. राजवाडे यांनी महाराष्ट्रात ध्येयवादी इतिहासकारांची परंपरा निर्माण केली. त्यांनी 'राजवाडे संशोधन मंडळ' व 'भारत इतिहास संशोधन मंडळ' या संस्थांच्या उभारणीसाठी

**क्रमशः**

डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

# गुड बाय डियर 2022



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**निघालास? सर्व बांधाबांध नीट केलीस ना? अरे हो बाबा हे सर्व तुला आणि तुलाच बोलतोय? काही राहिलच विसरून तर .....?बघ तुझी किंवा माझी कितीही इच्छा असली ना तरी तुला परत येता येणार नाही. हे तुला ठाऊक आहेच ना? आजपर्यंत तुझ्या अगोदरचे येऊन गेलेले कुणी परत येऊ शकलेत का? तसे असते तर आमचे बालपण आम्ही हक्काने परत बोलवले असते, मित्र मैत्रिणीच्या संगतीतले ते सुंदर क्षण पुन्हा येणे नाहीत म्हणूनच, ज्याचा अंदाज ए बया और होता...**

**तो गालिब आधीच म्हणून गेलाय,**
**मेहरबाँ हो के बुला लो मुझे चाहो जिस वक़्त**
**मैं गया वक़्त नहीं हूँ कि फिर आ भी न सकूँ**
ते काय खोटं थोड होत.

तर आमच्या जीवनात अनेक घडामोडी घडत असताना त्याचा साक्षीदार म्हणून आलेल्या प्रत्येक वर्षासारखा एक तू....! आलास तेव्हा उल्हास घेऊन आलास. कोरोना या महामारी पासून आमची सुटका झाल्याची वार्ता घेऊन आल्यासारखा तू आलास आणि हळूहळू जगरहाटी पुढे पुढे सरकवत राहिलास.

काळ म्हटलं की काळाच्या ओघात नव्याने काहीतरी अंकुरणार आणि जुने काहीतरी मरणा लागून जाणार हे निश्चित, पण तू घेऊन गेलास ती आमच्या हृदयावर कायमस्वरूपी साम्राज्य करणारी आमची गाणं साम्राज्ञी लता मंगेशकर त्या पाठोपाठ के के, बप्पी लहरी असे काही त्याच संगीत सागरातले लहान मोठे मोती सुद्धा तू घेऊन गेलास. दुःख विसरायचे तर हसता आले पाहिजे प्रसंगी स्वतःचे अश्रू लपवून हसवता आले पाहिजे अशा काहीशा जीवन ध्येयाने जगणाऱ्यातील राजू श्रीवास्तव ह्या हरहुन्नरी कलाकार आमच्या चेहऱ्यावर हास्य फुलवतो हे तुला सहन झालेच नाही. का रे बाबा असा ग्रामपंचायत मध्ये आम्ही तुझ्या विरुद्ध उभे राहिल्याचा राग आल्यासारखा वागतोस आमच्याशी ? बरं आम्ही ज्याच दुःखही enjoy केले तो "कौन कंबख्त" असं म्हणणारा अभिनय सम्राट दिलीप कुमार असो वा सांग कधी कळणार तुला म्हणत क्षणभर का होईना स्वतःच्या तारुण्यात फेरी मारल्याची जाणीव करून देणारे रमेश देव मराठीत खऱ्या अर्थाने आपली भूमिका जगताना तिचा आनंद लुटणारे विक्रम गोखले ज्याने तुझा स्वभाव पाहून म्हंटले असते, 'तू काळ म्हणून हलकट होतासच पण वर्ष म्हणून जास्त दळभद्री होतास", त्याशिवाय स्वतःच्या पदलालित्याने लावणीच्या क्षेत्रात स्वतःचा नावलौकिक उभ्या करणाऱ्या सुलोचना यांचे निधन मराठी सांस्कृतिक वर्तुळाचे मोठे नुकसान होते. महाभारत ह्या आमच्या बालपणाशी निगडित मालिकेत इंद्र आणि भीम म्हणून वावरणारे सतीश कौल आणि प्रवीण कुमार अश्या अनेक कलावंताच्या मरण घाईत किशोर नादलस्कर आठवतोय का ? जिस देश मे गंगा रहता है मधील गोविंदाचा सन्नाटा नावाचा मित्र... पक्का मराठी कलावंत हाही हरवला मागे घोर सन्नाटा उरवत...

आज पैसा कमावणे सोपे आरोग्य कमावणे कठीण हे सर्व जगाला दाखवून देत शेअर मार्केटमध्ये अनेक अंदाज जरी बरोबर आले तरी मरणाचा अंदाज ज्याला घेता आला नाही ते राकेश झुनझुनवाला हे जग सोडून गेले. 1965 पासून बजाज फाउंडेशन ची सुरुवात करणारे राहुल बजाज, टोयोटा कार ला भारतात आणणारे विक्रम किर्लोस्कर अशा उद्योगपतींचे निधन होणे आर्थिक क्षेत्राला चटका लावून जाणारे होते. चालू वर्षात लोकप्रभा या 40 वर्ष साहित्य संस्कृतीचा भाग राहिलेल्या नियतकालिकाचे बंद पडणे आणि चित्रलेखा हे मासिक सुद्धा बंद पडणार असे चर्चेतून कळणे ह्या गोष्टी साहित्यासाठी मारक आहेत हे मी वेगळे सांगायला नको.

साहित्य अकादमी हा उच्च मानदंड असलेला पुरस्कार सविनय नाकारून आपल्या साहित्याला आणि मनाला पूर्णत्व असल्याची भावना जपणारे नंदा खरे तसेच अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राहिलेले नागनाथ कोतापल्ले, अरुण अवचट, रामचंद्र देखणे ह्या जेष्ठ साहित्यिकांचा जाण्यापासून विदर्भातील मनोहर म्हैसाळकर आणि बुलडाणा जिल्ह्यातील मित्रवर्य नरेंद्र लांजेवार ह्या साहित्यिकांचे आणि खरे तर साहित्य चळवळ जपणाऱ्या साहित्यिक कार्यकर्त्यांच्या निधनाने साहित्य विश्वात पोकळी निर्माण करणे ह्या सर्व जबाबदाऱ्या घेत हे 2022 तू जात आहेस.

तसा दिलासा म्हणावा तर विदर्भातील साहित्य क्षेत्रात पवन नालट या युवा कवी मिळालेला युवा साहित्य अकादमी माझ्या मित्रपरिवारातील हबीब




भंडारे, विवेक उगलमुगले तसेच बुलढाणा जिल्ह्यातील नारायण येळगावकर अशा जाणिवेच्या साहित्यिकांची राज्य पुरस्कारासाठी लागलेली वर्णी मला स्वतःला दोन वेळेस हुलकावणी देणारा विदर्भ साहित्य संघाचा यावर्षी मिळालेला पुरस्कार, माझ्यासह अनेकांना ज्याची प्रतीक्षा होती त्या माझ्या काव्यप्रदेशातील स्त्री या समीक्षा ग्रंथाचे आगमन आणि चिखली येथे राज्यस्तरीय बहुजन साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद अशा माझ्या स्वतःच्या विश्वाला अल्पसमाधानी करणाऱ्या काही घटना 2022 घेऊन आले होते हे डिसेंबर संपत असताना समजलेच. वामनदादा कर्डक साहित्य संमेलनात किंवा आंबेडकरी साहित्य अकादमीच्या परिसंवादात बोलायला जात असताना माझ्यावर जीवापाड प्रेम करणाऱ्या लोकांनी तब्येतीची काळजी घ्या असे सांगून वर्षभरापूर्वी जिल्हा साहित्य संमेलनाच्या विचारपीठावर डिसेंबर 2021 मध्ये आलेली घेरी प्रेमाच्या फेरीत कशी रूपांतरित केली याचा प्रत्यय वर्षभरात वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या ठिकाणी येत गेला. हा जिव्हाळा प्रेम न विसरता येण्यासारखे.

राजकारणावर शहाण्यांनी बोलू नये असे म्हणतात, आणि मी तर बोलून चालून वेडाच त्यामुळे दोन चार शब्द तर बोलवेच लागतील .... तर महाराष्ट्राच्या अस्मितेचे केंद्रस्थान समजली जाणारी शिवसेना पाहता पाहता दोन तुकड्यात विभागली गेली. एकनाथराव शिंदे आणि उद्धव ठाकरे यापैकी कोणाची भूमिका योग्य हे ठरविण्याचा अधिकार आपल्याला निश्चित नाही. अधिकार वाणीन बोलावं असा अभ्यास तर नक्कीच नाही मात्र महाराष्ट्राच्या राजकारणासाठी जे झाले ते कितपत योग्य अशी प्रश्नभावना सर्वसामान्याच्या मनात निर्माण झाल्याचे चित्र लपविले तरी लपत नाही. अशातच महापुरुषासंदर्भात काहीही कारण नसताना केले जाणारे आक्षेपार्ह विधान यामुळे महाराष्ट्राच्या वैचारिक घुसमटीचे दर्शन झाले. गौतम बुद्धाच्या जीवन सत्य शोधक पदयात्रेचा आदर्श घेत वारकरी संप्रदायाची पैदल चालून समाजाच्या म्हणजेच जनतेच्या मनात आपली जागा निर्माण करण्यासाठी राहुल गांधीचे भारत जोडो यात्रा उद्या फलित काय देईल ? हे सांगणे कठीण असले तरी एक नवा अध्याय 2022 च्या इतिहासात जोडून गेली. मल्लिकार्जुन खडगे यांच्या रूपाने साधारण पंचवीस वर्षानंतर गांधी व्यतिरिक्त काँग्रेस पक्षाच्या अध्यक्ष पदाला नवीन चेहरा मिळाला. देवेंद्र फडणवीस ह्यांची मुसद्दी राजकारणी म्हणून ओळख पटली. आनंद दिघे ह्यांच्या व्यक्तिमत्वाचे पैलू जनतेला कळले.

मागील दोन वर्ष कोरोना या महामार्ग माणसांना हिरावून घेण्याचा गेली मागील वर्षी लंपी नावाच्या बिमारीने प्राण्यांची हेळसांड केली. आधुनिक ते सोबत आणि वेगवान जीवनासोबत कुठेतरी काहीतरी विषाणूला जन्म देत आहे आणि तो विषाणू आपला जीव घेत आहे ही जाणीव लंपीमुळे 2022 मध्ये ही कायम राहिली. सरता सरता पुन्हा एकदा कोरोनाच्या नव्या अवताराचा उगम झाल्याच्या बातम्या येत आहेत. त्यावर मात करण्यासाठी आपण सज्ज राहिले पाहिजे सावध राहिले पाहिजे असे आवर्जून सांगावे वाटते.

बुलडाणा जिल्ह्यात आणि इतरही काही ठिकाणी ग्रामपंचायत निवडणूक झाली त्यानंतर अंतर्गत घुसमुस वाढली ती थांबली पाहिजेत कारण निवडणूक एक दिवसाची आणि संबंध जीवनभर असतो हे लक्षात घेतले पाहिजेत. लवकरच जिल्हा परिषद पंचायत समितीची निवडणूक लागेल. त्याही वेळी निवडणुकीच्या दुसऱ्या दिवशी हार जीत विसरून संबंध जपण्याची प्रवृत्ती आणि दिलदार वृत्ती सर्वांनी ठेवली पाहिजे... ही अपेक्षा!

आपण सर्वसामान्य माणूस म्हणून फक्त अपेक्षाच ठेऊ शकतो जसे 2022 च्या साक्षीने समृद्धी महामार्गावर जीवनाची यात्रा सुसाट वेगाने सुरू झाली असून मनाचा ब्रेक लागला नाही तर विकासाची गती अपघातात परावर्तित होत आहे या जाणिवेतून 2023 मध्ये सर्व समावेशक जीवनमानाचा आणि सामान्य माणसाच्या विकासाचा मार्ग त्यात असेल ही अपेक्षा ठेऊन, 2022 ला सन्मानाने निरोप देत आणि 2023 ला हर्षोल्लासने wel come म्हणावे.

# हवा हवाई



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**एअर इंडिया विमानात नोव्हेंबर महिन्यात घडलेली एक घृणास्पद घटना आता जानेवारीत उजेडात आली आहे.दिल्लीला परदेशातून येणाऱ्या एअर इंडिया विमानात बिझिनेस क्लास मध्ये ही घटना घडलेली आहे. परदेशी प्रवासात मद्य दिले जाते. बिझिनेस क्लास मध्ये तर प्रवाशाचे नको तितके लाड होतात.**

फुकटचे मद्य मिळाले की अस्सल तळीराम अधिकच बेधुंद होतात. अशाच एका पुरुष प्रवाशाने बेधुंद अवस्थेत एका वृद्ध महिलेच्या अंगावर मूत्र विसर्जन केल्याची धक्कादायक लाजिरवाणी बातमी आहे.या महिलेने तक्रार करूनही तिला योग्य ती मदत मिळाली नाही. तिला हवाई सुंदरी बसतात ती बदली जागा देण्यात आली. इतर सीट्स रिकाम्या असून, बिझिनेस क्लास चे महागडे तिकीट असूनही या वृद्ध महिलेच्या तक्रारीची फारशी दखल घेण्यात आली नाही. एअर होस्टेस म्हणजे महिलाच. महिलेने वृद्ध महिलेच्या इतक्या गंभीर तक्रारीची दखल घेऊ नये हे असंवेदनशील वर्तन आश्चर्यात टाकणारे आहे. खरे तर या तरुणींना प्रवाशाशी कसे वागायचे,गंभीर प्रसंगाना कसे सामोरे जायचे याचे ट्रेनिंग दिले जाते. त्यांनी वैमानिकाला कल्पना का दिली नाही? दोन पैकी एका वैमानिकाने कोकपिट बाहेर येऊन या प्रसंगाची दखल का घेतली नाही? या मद्यधुंद व्यक्तीला दिल्लीला पोहोचताच महिलेशी इतके असभ्य वर्तन केल्या बद्दल पोलिसांच्या हवाली का केले नाही? मुलीवर बलात्कार झाला तर तिचे नाव प्रसिध्द करू नये हा अलिखित नियम.इथे एका वृद्ध महिलेच्या अंगावर मूत्र विसर्जन करणाऱ्या या बड्या आसामीचे नाव लपवण्याची काय गरज? या प्रवाशाला एक महिन्यासाठी प्रवासावर बंदी घातल्याचे प्रसिध्द झाले आहे.ही काय शिक्षा झाली?

खरे तर महिला आयोगाने या प्रसंगाची गंभीर दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना दम देऊन कारवाई करण्यास भाग पाडले पाहिजे.वृत्त पत्रातील बातम्यांचा आधार घेऊन ,तक्रारीची वाट न बघता कधी कधी सुप्रीम कोर्ट दखल घेतं असे ऐकिवात आहे.निदान एखाद्या संवेदशील महिला न्यायधिशाने तरी या किळसवाण्या घटनेची गंभीर दखल घेऊन तथाकथित आरोपी गजाआड होईल हे पाहावे..केंद्र सरकारने वरिष्ठ पातळीवर याची दखल घेऊन संबंधितांना ताबडतोब कारवाई करण्यास भाग पाडावे. महिलांचा असा अपमान होणे आपल्या देशाच्या प्रतिष्ठेला शोभणारे नाही.

असे प्रसंग टाळण्या साठी सर्वच एअर लाइन्स




नी योग्य ती पावले उचलायला हवी. विमानातच् नव्हे तर विमानतळावर देखील मद्य धुंद व्यक्तीचे तमाशे मी परदेश प्रवासात अनुभवले आहेत.ही मंडळी इतर प्रवाशा समोर नशेत मोठ्याने ओरडत असतात.चक्क जमिनीवर लोळतात.पण त्यांची कुणी दखल घेताना दिसत नाही. विमान प्रवासात किती मद्य सर्व्ह करावे, कुठल्याही अवस्थेत प्रवाशाला विमानात, विमानतळावर प्रवेश द्यावा, यासंबंधी च्या नियमांचे पुनपरिक्षण व्हावे.कारण अनेक तरुण मुली,महिला एकट्याने प्रवास करीत असतात. त्याच्या सुरक्षेचा,प्रतिष्ठेचा ,सन्मानाचा प्रश्न आहे.वरची घटना म्हणजे हे सगळे वेशीवर टांगले आहे की काय असा प्रश्न निर्माण करणारे आहे.प्रवासात महिलेवर होणारे असे दुर व्यवहार थांबायला हवेत.झालेल्या घटनेची गंभीर दखल घेऊन आरोपीवर कडक कारवाई संबंधित संस्था, म्हणजे पोलीस,न्यायालय,सरकार..हे मिळून करतील,अन् त्या वृद्ध महिलेला लवकरात लवकर न्याय मिळेल ही आशा करणे,एव्हढेच आपल्या हातात आहे.बघू या कोण कोण खडबडून जागे होते ते?

# आठवणीतले दादा कोंडके

आधुनिक केसरी

**दादा कोंडके एक भारतीय अभिनेता आणि चित्रपट निर्माता होते. ते मराठी चित्रपटसृष्टीतल्या नामांकित व्यक्तींपैकी एक होते, जे चित्रपटांमधील दुहेरी कलाकारांच्या संवादासाठी प्रसिद्ध होते. कृष्णा कोंडके ऊर्फ दादा कोंडके म्हणून ओळखले जाते. कोंडके यांचा जन्म मुंबईतल्या मोरबाग भागात किराणा दुकान आणि चाळींच्या मालकांच्या कुटुंबात झाला होता.**

त्याचे कुटुंबातील सदस्य बॉम्बे डायिंगचे गिरणी कामगार होते. दादा कोंडके यांना रौप्यमहोत्सव गाजवणाऱ्या सर्वाधिक चित्रपटांसाठी “गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये” नाव नोंदवले गेले. कोंडके यांना “दादा” असे संबोधले जात असे, ज्यांचा अर्थ “मोठा भाऊ” असा होता, ज्यामुळे त्याचे लोकप्रिय नाव दादा कोंडके होते. मराठी चित्रपट आणि भारतीय चित्रपटसृष्टीत द्वि-अर्थी (डबल मीनिंग) कॉमेडी प्रकारची ओळख करून देण्याचे श्रेय त्यांना देण्यात आले. अभिनयासोबतच त्यांनी प्रामुख्याने मराठी भाषेतील व सोबतच हिंदी व गुजराती भाषांतील चित्रपटांची निर्मितीही केली. सोंगाड्या (इ.स. १९७१), आंधळा मारतो डोळा (इ.स. १९७३), पांडू हवालदार (इ.स. १९७५), राम राम गंगाराम (इ.स. १९७७), बोट लावीन तिथे गुदगुल्या (इ.स. १९७८) हे त्यांचे विशेष गाजलेले चित्रपट होत. त्यांचा जन्म ८ ऑगस्ट, इ.स. १९३२ रोजी नायगाव, मुंबई, भारत, भारत येथे झाला होता. कोंडके हे मुंबईतील लालबाग जवळील नायगावमधील चाळीत सुती गिरणी कामगारांच्या कुटुंबात जन्मले आणि वाढले. त्याचे कुटुंब मूळचे पुण्याजवळील भोर राज्यात असलेल्या इंगवली या गावातले होते. त्यांच्या स्थलांतरित कुटुंबाने त्यांचे ग्रामीण भागातील जवळचे संबंध कायम ठेवले. एक तरुण असताना कोंडके हे एक लहान मूल होते आणि नंतर त्यांनी ‘बाजार’ नावाच्या स्थानिक किराणा किरकोळ साखळीत नोकरी घेतली. कोंडके यांनी करमणूक कारकीर्दीची सुरूवात बँडने केली आणि त्यानंतर स्टेज अभिनेता म्हणून काम केले. नाटक कंपन्यांसाठी काम करत असताना, कोंडके यांनी संपूर्ण महाराष्ट्रात दौरा केला ज्यामुळे स्थानिक लोकांची करमणुकीची आवड समजली.कोंडके या काँग्रेस पक्षाच्या सेवा दल स्वयंसेवक संघटनेच्या सांस्कृतिक कार्यात सामील झाले आणि त्यांनी नाटकांमध्ये काम करण्यास सुरुवात केली.



या काळात लेखक, वसंत सबनीस यांच्यासह अनेक मराठी रंगमंचावरील व्यक्तींच्या संपर्कात आले. नंतर कोंडके यांनी स्वतः ची नाट्यसंस्था सुरू केली आणि त्याच्यासाठी नाटकांची पटकथा तयार करण्यासाठी सबनीस यांच्याकडे संपर्क साधला.

खानखानपूरचा राजा (शाब्दिक अनुवाद, दिवाळखोर राजा) मधील दादांच्या अभिनयाचे सबनीस यांनी कौतुक केले आणि आधुनिक मराठी भाषा तमाशा किंवा लोकनाट्य (लोकनाट्य)लिहिण्यास सहमती दर्शविली. “इच्छा माझी पुरी करा”असं या नाटकाचं नाव होतं. हे नाटक संपूर्ण महाराष्ट्रात १५०० हून अधिक कार्यक्रमांवर चालले आणि दादांना एक स्टार बनवून टाकले. १९६९ साली भालजी पेंढारकरांच्या “तांबडी माती” ह्या चित्रपटातून पदार्पण केलेल्या दादांनी मग मागे वळून बघितले नाही. तांबडी माती पाठोपाठ आलेल्या “सोंगाड्या -(१९७१)” ने दादांचे आयुष्य बदलून टाकले. स्वतःच्या “कामाक्षी प्रॉडक्शन” ह्या चित्रपट निर्मिती कंपनीतर्फे १६ चित्रपट प्रकाशित करणाऱ्या दादांनी ४ हिंदी व १ गुजराती चित्रपट प्रकाशित केला. “इच्छा माझी पुरी करा” यांनी कोंडके यांना चर्चेत आणले आणि १९६९ मध्ये त्यांनी भालजी पेंढारकर यांच्या मराठीतील सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठी राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळविलेल्या तांबडी माती या चित्रपटाच्या भूमिकेतून मराठी चित्रपटांमध्ये पदार्पण केले. त्यानंतर १९७१ मध्ये सोंगाड्या चित्रपटाची त्यांनी निर्माता केले. वसंत सबनीस यांनी लिहिलेल्या एका कथेवर सोंगाड्या आधारित होता, त्याचे दिग्दर्शन गोविंद कुलकर्णी यांनी केले होते. त्यामध्ये दादा कोंडके यांनी नाम्याची भूमिका आणि कलावंताची भूमिका उषा चव्हाण यांनी केली.

सोंगाड्या (इ.स. १९७१), आंधळा मारतो डोळा (इ.स. १९७३), पांडू हवालदार (इ.स. १९७५), राम राम गंगाराम (इ.स. १९७७), बोट लावीन तिथे गुदगुल्या (इ.स. १९७८) हे त्यांचे विशेष गाजलेले चित्रपट होत.

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती औरंगाबाद

सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977



# झेप प्रतिष्ठानतर्फे बेहडपाडा आदिवासी पाड्यात स्वेटर वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** इनरीच सलोन यांच्या माध्यमातून आणि झेप प्रतिष्ठान यांच्या मार्गदर्शनाने जव्हार येथील बेहडपाडा या आदिवासी पाड्यात 230 विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप आणि मुला मुलींचे केस कापून नवीन वर्षाची सुरुवात करण्यात आली. शहरातील तापमान कमी होत असताना जव्हार सारख्या थंड हवेच्या ठिकाणी तापमान अत्यंत खालची पातळी गाठत असताना आदिवासी पाड्यातील मुलांना थंडीपासून रक्षण करण्यासाठी स्वेटरची अत्यंत गरज असते परंतु गरिबीमुळे या मुलांना आणि त्यांच्या पालकांना स्वेटर घेणे परवडत नाही.यावर उपाय म्हणून झेप प्रतिष्ठानच्या मार्गदर्शनाने झेप प्रतिष्ठान सदस्य श्री कल्पेश नाही आणि ENRICH सलून यांची संपूर्ण टीम यांनीही जबाबदारी पेलत या मुलांना शहरापासून जवळपास 200 किलोमीटरवर असणाऱ्या बेहेडपाडा या आदिवासी गावात जाऊन स्वेटर वाटप केले. तसेच यातील ज्या मुलांचे केस प्रमाणापेक्षा जास्त वाढले होते त्या मुला मुलींचे केस मोफत कापून देण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या अशा टीमचे गावातील गावकऱ्यांनी आणि शिक्षक वर्गांनी मनापासून कौतुक केले. जव्हार हा तालुका आदिवासी भवन असून येथे रोजंदारी आणि वीट भट्टीवर काम करणारे भरपूर लोक आहेत. आई वडील कामानिमित्त शहरात किंवा कोणत्या वीट भट्टी वरती असताना घरातल्या मुलांची जबाबदारी ही घरात असणारा ज्येष्ठ नागरिक किंवा घरातील मोठ्या मुलांवरती पडते. थंडी वाऱ्यापासून वाचण्यासाठी मिळेल ते कपडे वापरून मुलं शाळेत येण्याचा प्रयत्न करतात. या मुलांसाठी अशा स्वेटर वाटप उपक्रमाची फारच गरज असल्याने अशा प्रकारचे कार्यक्रम विविध आदिवासी पाड्यात राबविण्यात यावे, असे झेप प्रतिष्ठानचे विकास धनवडे यांनी सांगितले.

# जुबेरखां पठाण बेस्ट टॅलेंट अवॉर्डने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** आयकॉनिक मॉडेलिंग इन्स्टिट्यूट अहमदनगर, स्वप्नील भोसले आणि मिस्टर इंडिया इंटरनॅशनल स्टार प्रज्वल भिंगारदेव प्रस्तुत 'मिस्टर अँड मिस ग्रॅमर आयकॉन ऑफ महाराष्ट्र २०२२-२०२३ सिजन- ४ या स्पर्धेच्या ग्रँड फिनाल मध्ये ५० तरुण-तरुणींनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत कन्नडच्या कणकावती नगर कारखाना येथील रहिवासी मोहम्मद जुबेरखा हसनखा पठाण यांनी 'बेस्ट परफॉम ऑफ द इयर'व थर्ड रनरअप व बेस्ट टॅलेंट अवॉर्ड मिळविला आहे. याच बरोबर त्यांना टी-सिरीजच्या पंजाबी गीत अलबम मध्ये आपली कला सादर करण्याची संधी मिळाली आहे. मोहम्मद जुबेर पठाण यांची ही निवड यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले रील स्टार प्रज्वल भिंगारदेव, हिंदवी सरकार पाटील, वैष्णवी जाधव,साहील बागवान, रबनवाज सुभेदार यांनी जुबेरचे कौतुक केले. कन्नडचे नाव महाराष्ट्रात उंचावल्याबद्द किशोर वाळुंजे, जावेद शेख, सलिम शेख, वाहेद शेख, अविनाश टाकळकर, शरद काळे, अजय पातळे, शाहबाज कुरेशी, खालेद शेख व मित्रपरिवाराने अभिनंदन केले आहे.




# उंदीरवाडी शाळेतील उपक्रम रेत पाटीवर गिरवत आहेत अक्षर



आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** शालेय जीवनातील अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा पहिला वर्ग. विद्यार्थ्यांचा श्री गणेशा सुरू होतो. शिक्षणाची गोडी निर्माण होण्यासाठी व शाळेत शंभर टक्के उपस्थिती राखण्यासाठी ही उपयुक्त अध्ययन पद्धत अवलंबली आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उंदिरवाडी येथील पहिलीचे विद्यार्थी अत्यंत आनंदाने पाठी, पेन्सिल, वही, पेन विना गिरवत आहेत अक्षर व शब्द तेही अगदी आनंदाने. पहिलीचे वर्गशिक्षक उपक्रमशील शिक्षक अंगद लोणे यांनी नुकतेच समुद्रकिनारी गेले असता त्यांनी ही रेती आणून आपल्या मुलांना रेतपाटी वर अक्षर शब्द लेखन सराव घेत आहेत. वही, पेन वर लेखन करताना विद्यार्थी कंटाळवाणा करतात. पण ह्या रेतपाटी वर विद्यार्थी अगदी आनंदाने लेखन सराव करत आहेत. शाळेचे मुख्याध्यापक संजय धनाड यांनी विद्यार्थ्यांचे व वर्ग शिक्षकांचे कौतुक केले.

# मंगनाळीतील विनापरवाना बांधकामावर कारवाई का नाही ?

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यातील मंगनाळी येथील रहिवाशी किशन पिराजी संगावार यांनी विनापरवाना घराचे बांधकाम करित आहे. हे गट विकास अधिकाऱ्यांनी नेमलेलेल्या त्रिसदस्यीय समितीच्या चौकशी अहवालातून समोर आल्यामुळे कारवाई करण्याचे निर्देश देऊनही कारवाई होत नसल्यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे. मंगनाळी येथील किशन संगावार यांनी चालू नमुना आठ मालमत्ता क्रमांक 423 मध्ये घर बांधकामासाठी ग्रामपंचायत व गटविकास अधिकाऱ्याकडे बांधकाम परवानगी मागितली होती. मात्र हे बांधकाम विवादास्पद असल्यामुळे हे प्रकरण गटविकास अधिकाऱ्याकडे आले. गट विकास अधिकारी आर.एस.बजाज यांनी 19 ऑक्टोंबर 2022 ला या प्रकरणात एक त्रिसदस्यीय समिती नेमली. या समितीने आपला चौकशी अहवाल सादर केला असून दोन प्रमुख निष्कर्ष काढले आहेत. एक, मालमत्तेची भोगवटयात नोंद आहे पण मालकी हक्कात नोंद नाही. तसेच जागेची चर्तुसीमा मिळकत रजिस्टर मध्ये 0×0 चौरस फुट असल्यामुळे प्रशासनाने परवानगी नाकारली. दोन, पवन संगावार यांनी ही किशन संगावार यांनी आपल्या जागेत अतिक्रमण केल्याची तक्रार केली होती.परंतु चौकशी समितीने मात्र हे साफ फेटाळले आहे. किशन संगावार यांनी विनापरवाना घराचे बांधकाम केल्यामुळे आपल्या घराकडे जाणारा पारंपरिक रस्त्यावर अतिक्रमण झाले आहे असा आरोप ललेश संगावार यांनी केला होता. हे अतिक्रमित बांधकाम तात्काळ पाडण्यासाठी ललेश संगावार यांनी उपोषण केले, निवेदने दिले, आत्मदहनाचा इशारा दिला.मात्र प्रशासनाने आश्वासनाच्या पलीकडे काही दिले नाही. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 कलम 52 मधील पोटकलम 4 अनव्ये ग्रामपंचायतीने कारवाई करणे अपेक्षित असतांना तसे केले नसल्याचा ठपका ही चौकशी समितीने ठेवला. मात्र तरीही ग्रामपंचायत अजूनही कारवाई करित नसल्यामुळे तर्क - वितर्क लढविले जात आहेत.

# तरुणीचा आत्महत्येचा प्रयत्न, दामिनी पथकाने वाचवले प्राण

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** प्रेमभंग झालेल्या तरुणीने झोपेच्या गोळ्या खात आत्महत्येचा प्रयत्न केला. या विद्यार्थिनीचे दामिनी पथकाच्या तत्परते मुळे प्राण वाचले. सुजाता (नाव बदलले) ही निराला बाजार परिसरात काल (५\०१) रोजी दु ४वा. रडत बसली आहे. असे नियंत्रण कक्षाकडून क्रांतीचौक पोलिसांना कळवण्यात आले.त्यांनी सुजाताला घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. हा प्रकार तिच्या वडलांना कळवण्यात आला. वडील घाटी रुग्णालयात आल्यानंतर सुजाताचा जबाब नोंदवला. प्रेमभंग झाल्यामुळे सुजाताने टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती तपासात उघंड झाली. वरील कारवाई सहाय्यक पोलिस निरीक्षक सुषमा पवार,पोलिस कर्मचारी लता जाधव, कल्पना खरात, मनीषा बनसोडे यांनी पार पाडली.



फुलंब्री तालुक्यातील दारीफाटा येथे महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री ना. अब्दुल सत्तार यांचा सत्कार करण्यात आला. तसेच वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या ज्यावेळी भा.ज.पा. युवा मोर्चा शराध्यक्ष वाल्मिक जाधव मा. सरपंच कन्होरी प्रभाकर सोटम संतोष बोर्डे सुनील शेवाळे, नवनाथ शेवाळे, रियाझभाई, मोबीन पाशा, लुकमन शहा, शंभूभाई शेख, कलीम भाई, शेकूर भाई यांचा सह कार्यकर्ते उपस्थित होते.

# भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे अधिवेशन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील कूंभारी येथे दिनांक 3 व 4 जानेवारी 2023 ला कुंभारी येथे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय श्री प्रदीप बाबा पाटील खांडापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख उपस्थित कुंभारी येथे राज्यस्तरीय अभ्यास शिबिर घेण्यात आले. या शिबिरात राज्यातील सर्व 36 जिल्ह्यातील राष्ट्रीय कार्यकारिणी महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी विभागीय अध्यक्ष जिल्हाध्यक्ष तालुकाध्यक्ष व सर्व महिला पुरुष युवक युवती इत्यादी सर्व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यावेळी अभ्यास शिबिरात माहिती अधिकार संघटनेची बांधणी संघटने विषयी सविस्तर माहिती शासकीय योजनांची माहिती इत्यादी सर्व माहिती देण्यात आली. तसेच भ्रष्टाचार उघड कसा करायचा व त्याचा पाठपुरावा कसा करायचा तसेच पदाधिकारी यांच्यावर होणारे भ्याड हल्ले व खोटे गुन्हे दाखल केले तर याविषयी सविस्तर मार्गदर्शन अरुण चव्हाण देशमुख प्रदेशाध्यक्ष यांनी केले. व प्रमुख पाहुणे बबलू शेठ भन्साळी सभापती जळगाव जिल्हा परिषद फत्तेपूर हे होते यावेळी प्रमुख उपस्थिती प्रदीप बाबा पाटील खंडापूरकर राष्ट्रीय अध्यक्ष अरुण चव्हाण, श्रावण रावणकुळे, उद्योग विभाग प्रदेशाध्यक्ष अमोल नानजकर, राष्ट्रीय सरचिटणीस शोभाताई बल्लाळ, राष्ट्रीय उपाध्यक्ष सन्ना शेख, प्रदेश अध्यक्ष युवती विभाग एडवोकेट राणीताई स्वामी, प्रदेशाध्यक्ष महीला आघाडी अंजनाताई राजपूत, जिल्हाध्यक्ष महिला आघाडी औरंगाबाद, विजयालक्ष्मी काळे, विभागीय अध्यक्ष मराठवाडा महिला आघाडी सारिका महाला, अमरावती जिल्हाध्यक्ष माया कोळी, जिल्हाध्यक्ष जळगाव महिला आघाडी, सोनल पाटील तालुका अध्यक्ष धरणगाव, सुवर्णा पाटील तालुकाध्यक्ष, योगिता ठाकूर, नेताजी जाधव, महेश पाटील, प्रवीण दादा बोरसे, महाराष्ट्र जनरल सेक्रेटरी उल्हास दादा पाटील प्रदेशाध्यक्ष माजी सैनिक विभाग, संतोष ठाकरे पाटील प्रदेश अध्यक्ष आयटी विभाग श्री विलास पवार प्रदेश कार्याध्यक्ष व कार्यक्रमाचे



आयोजक अध्यक्ष योगेश वाणी, सरचिटणीस माजी सैनिक विभाग पंडित तिडके, विभागीय अध्यक्ष मराठवाडा श्री पवन देशमुख विभागीय अध्यक्ष विदर्भ श्री हरिहर बोचरे टेक्निकल सल्लागार महाराष्ट्र राज्य अनिल दादा देसले, उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष हितेश दाभाडे, सरचिटणीस कार्यक्रम समिती सचिव प्रभाकर साळवे, सरचिटणीस वसंतराव देशमुख जिल्हाध्यक्ष, महेश दादा पाटील जिल्हाध्यक्ष जळगाव राहुल पाटील जिल्हा उपाध्यक्ष जळगाव श्री अनमोल केवटे जिल्हा अध्यक्ष सोलापूर भिवा नदंआप्पा काळे जिल्हाध्यक्ष नाशिक श्री अशोक सोनवणे जिल्हा संघटक जळगाव एकबाल कासम तडवी बागुल जिल्हाध्यक्ष औरंगाबाद आदिवासी विभाग हेमंत पाटील फुलंब्री तालुका अध्यक्ष गजानन वाघ जिल्हा सरचिटणीस औरंगाबाद कौतिक दांडगे तालुका संघटक सिल्लोड बाळासाहेब देशमुख भोकरदन तालुका अध्यक्ष पंजाबराव सपकाळ भोकरदन तालुका उपाध्यक्ष सुनील उंबरे भोकरदन तालुका संघटक गोकुळसिंग राजपूत तालुकाध्यक्ष सोयगाव, शेख अजहर तालुका सचिव सोयगाव, चेतन राठोड तालुका अध्यक्ष सोयगाव, सुभाष पाटील गायकवाड तालुका अध्यक्ष खुलताबाद राजू तडवी तालुका अध्यक्ष भोकरदन आदिवासी विभाग इत्यादी सर्व संघटनेचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती.



# खंडाळा येथे साई पारायण व रामायण कथा आरंभ

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुक्यातील खंडाळा येथील साई क्रांती रत्न, युवा शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळ यांच्या वतीने गुरुवार( ता,०५ ) रोजी सकाळी शिर्डी चे साईबाबा यांचे साई सच्चरीत पारायण आरंभ झाले,व सायंकाळी संगीतमय तुलसी रामायण कथा रामायणाचार्य हभप विकास महाराज गायकवाड यांच्या अमृत वाणीतून आरंभ झाले, साई सच्चरीत पारायण साठी २०५ साई भक्त बसलेले आहेत, वाचक ज्ञानेश्वर माऊली गायकवाड आहेत,सायंकाळी रामायणाचार्य विकास महाराज गायकवाड यांचे खंडाळा गावात आगमन होताच लेझीम पथक व शोभेची दारू सोडून त्यांचे जोरदार स्वागत झाले,व्यासपीठावर प्रभू रामचंद्र यांची भव्य दिव्य मूर्ती आहे, साईबाबा यांचीही मूर्ती आहे,या समयी वैजापूरचे सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत व महाराष्ट्र नारायणी सेनेचे अध्यक्ष अशोक आप्पा पवार यांनी विकास महाराज यांचे पूजन केले उपसरपंच यांनी सपत्नीक पूजन केले या समयी उत्तम पवार यांची उपस्थिती होती,मंडळाच्या कार्यकर्त्यांनी छान नियोजन कलले आहे,बुधवार ता,११रोजी गावातून साई पालखी मिरवणूक निघणार व शिर्डीला व शुक्रवार ता१३रोजी पायी पालखी मिरवणूक शिर्डीला जाणार आहे.

# पूजा घायाळ हिचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

आधुनिक केसरी न्यूज

**लोणगाव :** येथून जवळच असलेली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा घायाळवाडी येथील इयत्ता सातवीत शिकणारी विध्यार्थीनी कुमारी पूजा गणेश घायाळ हिने शालेय शिष्यवृत्ती परीक्षेत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होऊन यश संपादन केले आहे. मागील दोन वर्षांपूर्वी तिने ही परीक्षा दिली होती परंतु कोविडमुळे या परीक्षेचा निकाल लांबणीवर पडला होता. आता मात्र नुकताच शालेय शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून या परीक्षेत पूजाने कुठल्याही खाजगी शिकवणी शिवाय तिने हे यश मिळवले आहे. शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन आणि अभ्यासाविषयी तिच्या मनातील प्रेरणा या दोन गोष्टींमुळे तिला हे यश मिळाले आहे. अगदी सामान्य कुटूंबातील



पूजाने शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवल्या बद्दल लोणगाव येथील ग्रामपंचायत आणि जि. प.प्राथमिक शाळा यांच्या वतीने पुजाचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी सरपंच राजू खरात, उपसरपंच पांडू साखरे, ग्राम पंचायत सदस्य राहुल काकडे, विनायक झिने, जुमन शहा, बळीराम कोरडे, विष्णू बरोकर, आत्माराम मामा राजळे, उद्धव घायाळ, संतोष सावंत, संतोष झिने, कडुबा राजळे, शिवाजी घायाळ शाळेतील मुखध्यापक-भगवान घायाळ, शिक्षक गणेश घुगे यासह ग्रामस्थांनी पूजाचे कौतुक केले आहे.

# भाजपच्या कुटील डावाला बळी पडू नका : तपासे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्रातील भूमीपूत्रांच्या नोकरीचे आणि गुंतवणूकीचे संरक्षण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी करावे आणि भाजपच्या कुटील डावाला बळी पडता कामा नये अशी भूमिका घ्यावी असा सल्ला राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी दिला आहे. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मुंबईत येऊन बॉलिवूड आणि उद्योग उत्तरप्रदेशमध्ये नेण्याचे केलेल्या विधानाचा महेश तपासे यांनी खरपूस समाचार घेतला. गुजरात पाठोपाठ आता उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री महाराष्ट्रातील उद्योग व बॉलिवूड पळविण्यासाठी मुंबईत ठाण मांडून बसले आहेत.ज्या बैठका त्यांनी घेतल्या त्यामध्ये त्यांनी उत्तरप्रदेशचे व्हिजन सांगितले.परंतु ही सर्व उत्तरप्रदेशमधून सर्वाधिक खासदार निवडून आणण्यासाठी भाजपची रणनीती आहे असा आरोप महेश तपासे यांनी केला आहे.
गुजरातची निवडणूक होती त्यावेळी महाराष्ट्रातील उद्योग पळवण्यात आले आणि गुजरातमध्ये सरकार आणले. आता ही लोकसभेची पूर्वतयारी म्हणून महाराष्ट्रातून उद्योग उत्तरप्रदेशमध्ये पाठवण्याचा डाव भाजप रचत आहे. या डावाला हाणून पाडण्याचे काम महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी करावे असे आवाहनही महेश तपासे यांनी केले आहे.





# पत्रकार दिनानिमित्त बाजार सावंगी ग्रा.पं.च्या वतीने पत्रकारांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी ग्रुप ग्रामपंचायत पत्रकार दिनानिमित्त मराठी पत्रकारितेचा पाया भक्कमपणे उभा करण्यासाठी मोलाचे कार्य करणारे मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने अभिवादन करून पत्रकारांचा सत्कार करण्यात आला यावेळी सरपंच आप्पाराव नलावडे माजी सरपंच भीमराव नलावडे ज्येष्ठ समाजसेवक पुंजाजी नलावडे कल्याण काटकर सदस्य पोपट काटकर अरुण गायकवाड ग्रामविकास अधिकारी बनसोड यावेळी जेष्ठ पत्रकार श्रीधर पाटील चांद का पठाण सय्यद लाल नामदेव नलावडे हरिदास सराटे रामेश्वर नलावडे मुनीर शहा सचिन गवळी विनोद नलावडे शेख हबीब जीवन राजपूत ज्ञानेश्वर वरदे यावेळी पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांच्या शुभहस्ते 'महाराष्ट्र केसरी'च्या लोगोचे अनावरण

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** महाराष्ट्रातील प्रतिष्ठित अशा 'महाराष्ट्र केसरी' कुस्ती स्पर्धेचा थरार येत्या १० जानेवारीपासून पुण्यातील कोथरूडमध्ये रंगणार आहे. या 'महाराष्ट्र केसरी'च्या लोगोचे अनावरण आज राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते तर विरोधी पक्षनेते अजित पवार, क्रीडा व युवक कल्याण मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत झाले.

म्हाळुंगे येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात झालेल्या कार्यक्रमावेळी 'महाराष्ट्र केसरी'चे प्रमुख संयोजक माजी महापौर मुरलीधर मोहोळ, आमदार भीमराव तापकीर, आ. सुनील कांबळे, भाजपा शहराध्यक्ष जगदीळ मुळीक, चिंचवड कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष पै. हनुमंत गावडे, पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष पै. संदीप भोंडवे, पुणे राष्ट्रीय तालीम संघाचे अध्यक्ष पै. योगेश दोडके, अहमदनगर कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष पै. वैभव लांडगे, दादोजी कोंडदेव पुरस्कार विजेते पै. विलास कथुरे, पै. मेघराज कटके, पै. नवनाथ घुले, पै. गणेश दांगट, पै. माऊली मांगडे, पै. कृष्णा बुचडे, पै. संतोष माचुत्रे आदी उपस्थित होते. मुरलीधर मोहोळ म्हणाले, स्वर्गीय मामासाहेब मोहोळ यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या




'महाराष्ट्र केसरी'चे आयोजन यंदा मोहोळ कुटुंबीयांकडे आहे. स्वर्गीय मामासाहेब मोहोळ क्रीडानगरी, कोथरूड येथे स्पर्धेची तयारी अंतिम टप्प्यात असून, आज मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, क्रीडामंत्री व विरोधी पक्षनेते यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत झाले, याचा आनंद होत आहे.

# शांताराम मगर यांना राजमाता जिजाऊ राज्यस्तरीय पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** अंधश्रद्धा निर्मूलन वैज्ञानिक दृष्टिकोन समिती तसेच मा. डॉ.प्रतापराव दिघांवकर प्रेणित बळिराजे आत्मसंन्मान संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा मानाचा राजमाता जिजाऊ राज्यस्तरीय पुरस्कार ह्यावेळेस अंधश्रध्दा निर्मुलन व शेतीविषयक लेखांची दखल घेवुन लोणी येथील बातमीदार शांताराम मगर यांना देण्यात येनार असल्याचे अंधश्रध्दा निर्मुलन व वैज्ञानिक समितीचे अध्यक्ष रंजनजी खरोटे तान्हाजी शिन्दे व बळीराजाचे संस्थापक अध्यक्ष जितेंद्र वाघ यांनी संयुक्तरित्या पत्राद्वारे कळवले आहे १५ जानेवारीला सकाळी ११वाजता कल्याण भवन,धुळे येथे दिमाखदार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात येनार आहे , शांताराम मगर हे उत्तम छायाचित्रकार पत्रकार आसुसून यांनी प्रिंट मीडियातून यांनी सातत्याने अंधश्रद्धा निर्मूलन आणि ग्रामीण विकासाच्या प्रश्नांना त्यांनी वाचा फोडली आहे. सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून विधायक व सुसंस्कृत पत्रकारितेचा वसा व वारसा त्या जोपासत आहेत. तसेच शेती, शिक्षण, महिला सबलीकरण, साहित्य व आध्यात्मिक सांस्कृतिक शैक्षणिक राजकीय क्षेत्रांतील दैनंदिन घडामोडींवर लक्ष वेधून घेणारी विधायक व विकासात्मक पत्रकारिता हा त्यांच्या आवडीचा विषय आहे. त्यामुळे त्यांना राजमाता जिजाऊ राज्य स्तरीय उतक्रुष्ठ पत्रकारीता पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. त्यांच्या निवडीची नंतर महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई पदाधिकाऱ्यांसह जिल्हाध्यक्ष डॉ प्रभु गोरे याच्यासह आनेक मान्यवरांनी शांताराम मगर यांना शुभेच्छा दिल्या आहे.सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# सावळदबारा येथील निखील टीकारे युवक काँग्रेस तालुका अध्यक्षपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील निखिल पंढरी टिकारे यांची सोयगाव तालुका युवक काँग्रेस अध्यक्ष पदी निवड डॉ.कल्याण काळे जिल्हा अध्यक्ष औरंगाबाद यांच्या हस्ते निवड करण्यात येऊन त्यांना निवडीचे पत्र देण्यात आले. निखील पंढरी टीकारे आपली निवड तालुका अध्यक्षपदी कण्यात आली असून पक्षाचे ध्येय धोरण तळा गळात पोहचावे तसेच पक्ष संघटन मजबूत करावे हि अपेक्षा ठेऊन आपली अध्यक्षपदी निवड करण्यात आली. मला पक्षाचे विचार सर्व सामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी माझे सहकार्य राहील, तसेच आपल्याला दिलेली जबाबदारी आपण प्रामाणिकपणे पार पाडाल असा विश्वास काँग्रेसच्या पक्षाच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. निखील टिकारे यांना पक्षाच्या वतीने मान्यवरांनी व पदाधिकारी यांनी शुभेच्छाचा वर्षाव केला यावेळी सोयगाव, फर्दापूर, सावळदबारा परिसरातील मान्यवर उपस्थित होते.





# कितीही साधने बदलली तरी पत्रकारितेचे महत्व कमी होणार नाही : बालाजी सूर्यवंशी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मराठी पत्रकार परिषद, मुंबई संलग्न, औरंगाबाद मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीदिनी शुक्रवारी (दि.६) अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विविध माध्यमातील प्रतिनिधी, पत्रकार, संपादक यांची उपस्थिती होती. यावेळी औरंगाबाद मराठी पत्रकार परिषदे चे विभागीय सचिव बालाजी सूर्यवंशी म्हणाले की, मराठी पत्रकारांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा आदर्श अंगीकारावा, आजच्या युवा पत्रकारांनी आधुनिक तंत्रज्ञान शिकून स्वाभिमानाने बदलत्या काळाची पत्रकारिता करावी. कितीही साधने बदलली तरी पत्रकारितेचे महत्व कधीच कमी होणार नाही. समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्यासाठी आपण सर्वांनी निस्वार्थ भूमिका निभावावि आणि पत्रकारितेचा स्तंभ आणखी मजबूत करावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. स्वातंत्र्य सैनिक कॉलनीतील स्वातंत्र्य सेनानी स्वामी रामानंद तीर्थ सभागृहात आयोजित अभिवादन कार्यक्रमा प्रसंगी औरंगाबाद मराठी पत्रकार परिषदे चे विभागीय सचिव बालाजी सूर्यवंशी, परिषदेचे जिल्हा अध्यक्ष सुनीलचंद्र वाघमारे, सचिव कानीफ अन्नपूर्णे, एम.पी. जामनिक, प्रसिद्धी प्रमुख सचिन एस. अंभोरे, किशोर महाजन,सुभाष पाटोळे, एल.व्ही. बिडवे. नजिम काजी, गणेश वासलवार, संतोष देशमुख, तुषार बोडखे, पुरुषोत्तम पाटील, सावेश जाधव, राजू खंडाळकर, भास्कर निकाळजे, सिद्धेश्वर थोर, भानुदास मते, आदींची यावेळी उपस्थिती होती.

# 'काळूबाईच्या नावानं चांगभलं'च्या जयघोषात मांढरदेव यात्रेला सुरवात

आधुनिक केसरी न्यूज

**वाई :** काळूबाईच्या नावाने चांगभलं' च्या जयघोषात मांढरदेव येथील यात्रेला सुरवात झाली. कडाक्याच्या थंडीत मांढर गडावर मोठ्या संख्येने भाविकांनी पहाटेपासून गर्दी केली आहे. देवस्थान ट्रस्ट व प्रशासनाकडून देवीची सालंकृत पूजा करण्यात आली. देवीला यावेळी सोन्याच्या दागिन्यांनी मढविण्यात आले. मंदिर आणि परिसर आकर्षक फुलांनी आणि विद्युत रोषणाईने सजविण्यात आले आहे.



मांढरदेव येथील काळूबाई यात्रा दरवर्षी पौष पौर्णिमेला (शाकंभरी पौर्णिमेला) भरते. यात्रेनिमित्त प्रशासनाकडून आज जिल्हा न्यायाधीश तथा देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा मंगला धोटे, जिल्हा सत्र न्यायाधीश शिवय्या नंदीमठ व वाईचे प्रांताधिकारी राजेंद्र जाधव, तहसीलदार रणजित भोसले, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. शितल जानवे – खराडे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी देविदास ताम्हाणे, पोलीस निरीक्षक बाळासाहेब भरणे सर्व ट्रस्टी निवासी नायब तहसीलदार गितांजली गरड, वैशाली जायगुडे, स्वरुपाताई संग्राम थोपटे पहिले भाविक रोशनी व राहुल कदम, विंग सातारा आदींच्या उपस्थिती महापूजा करण्यात आली. यावेळी विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यात्रेनिमित्त गुरुवारी गडावर देवीचा जागर, गोंधळ झाला. काळूबाई देवीची रात्री मांढरदेव गावातून ढोल ताशांच्या गजरात, गुलालाच्या उधळणीत छबिना मिरवणूक काढण्यात आली होती. छबिण्यानंतर पहाटे पालखी देवीच्या मंदिराजवळ आली. मंदिरालगतच्या पारावर पालखी आल्यानंतर भाविकांनी दर्शन घेण्यासाठी एकच गर्दी केली होती. मुखवटे घेतलेल्या असंख्य महिला भाविकांनी गर्दी केली होती. सातारा प्रशासनाकडून यात्रेची जय्यत तयारी करण्यात आली आहे. मोठा पोलीस बंदोबस्त तैनात आहे. खाजगी सुरक्षा रक्षक बंदोबस्त करण्यात आला आहे. वाईला कृष्णातीर गणपती घाट भाविकांनी फुलून गेला आहे. दोन वर्षांच्या करोनाकाळानंतर यात्रा भरत असल्याने मोठी गर्दी आहे.

प्रतिबंधात्मक बंदी आदेशानुसार मांढरदेव परिसरामध्ये यात्रा कालावधीमध्ये मांढरदेव मंदिर परिसरामध्ये नारळ फोडणे, तेल वाहण्यास पूर्ण बंदी करण्यात आलेली आहे. पशुहत्या करण्यास मनाई करण्यात आली आहे. कोंबड्या, बकऱ्या, बोकड इत्यादी प्राण्यांचा बळी देण्यास, हत्या करण्यास तसेच वाहनातून यात्रेच्या ठिकाणी घेवून जाण्यास मनाई करण्याती आली आहे. मांढरदेव परिसरात वाद्य आणण्यास व वाजविण्यास, मांढरदेव परिसरात तसेच देवालयाच्या परिसरात असणाऱ्या झाडांवर खिळे ठोकण्यास, लिंबू टाकणे, काळ्या बाहुल्या, बिबे, भानामती करणे, करणी करण्यास प्रतिबंध करण्यास आले आहे. तसेच, परिसरात दारू, मद्य जवळ बाळगणे, वाहतूक करणे, विक्री करण्यास प्रतिबंध करण्यात आले आहे. एकूणच मांढर गडावर भाविकांची मोठी गर्दी असून देवीचा जयजयकार सुरू आहे.



नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर
घर संसार



सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# कृतीशील समाजसुधारक श्री संत भगवानबाबा



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**"तैसा व्यासाचा मागोवा घेतु" या संत ज्ञानेशांच्या प्रेमानुभूतीनुसार जेष्ठ-श्रेष्ठांचा मागोवा घेऊनच जीवनाची खडतर वाट सुकर करण्याचा प्रयत्न होणे अपेक्षित आहे. आधुनिक काळात अनेक सामान्यांतील सामान्य माणसांनीच असामान्य इतिहास घडवला आहे ! आजमितीला कुणीही कुणाला तुच्छ लेखू नये अथवा आत्मक्लेश करून घेऊ नये. माऊली ज्ञानेश्वरीमध्ये,दिवटीच्या आंगीं थोरी | तरी ते बहु तेज धरी | वाती आपुलिया परी | आणीच कीं ना ? ॥ ह्या ओव्यांच्या द्वारे दिवटी असो की वात, आपापल्या परीने प्रकाश देण्याचे कार्य करत असते असा उपदेश करतात.**

याच न्यायाने महाराष्ट्राच्या दुर्गम, मागास आणि उसतोड कामगारांच्या बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यात सामान्य कुटुंबात कृतीशील समाजसुधारक राष्ट्रसंत भगवानबाबांचा जन्म झाला. बीड जिल्ह्यातील डोंगरमाथ्यावरील विविध नद्यांच्या उगम-संगमावरील सुप्पे सावरगावात श्रावण वद्य पंचमी, शके 1818 (29 जुलै, 1996) सोमवार रोजी सूर्योदय समयाला सौ.कौतीकाबाई तुबाजी सानप (पाटील) यांच्या पोटी आबाजी नावाचे रत्न जन्मले. आबाजींचे बालपण कडक शिस्त आणि संस्कारात गेले. एकीकडे आईचे रामायण-महाभारताचे भक्तिभावाने श्रवण, गावातील नित्य भजन-कीर्तन याचे संस्कार बाल आबाजींवर झाले, तर दुसरीकडे वडील तुबाजी पाटील हे गावची पाटीलकी सांभाळतांना आपल्या मुलाबाळांवर शिस्त, व्यायाम, जिद्द आणि कष्ट करण्याचे संस्कार रुजवले. 'येथं वडील जे जे करिती तया नाम धर्म म्हणीती' या न्यायाने आपल्या घरातच आबाजींना आई-वडील आणि अन्य मंडळींकडून सुसंस्कार आणि शिस्तीचे बाळकडू मिळाले.

घरातील सर्व नियमित संस्कार-सोपस्कार चालले असतांना विद्यार्थी दशेतील बाल आबाजी मात्र थोडा एकटा आणि आपल्याच विचारात मग्न असायचा. कधी-कधी एकटाच शून्यात दृष्टी ठेवून तासंतास एकाच जागी बसायचा ! अक्षरशः आई कौतीकाबाई त्याला हलवून भानावर आणायच्या ! घरातील सर्वांनाच आबाजीचं हे वर्तन थोडं विचित्रच वाटायचं ! तर दुसरीकडे अभ्यासु वृत्ती, आज्ञाधारकता, वळणदार अक्षर, रुबाबदार बोलणे, शांत-संयमी स्वभाव यामुळे शाळेत आबाजी शिक्षकांचा आणि गावात सवंगड्यांचा जिवलग झाला. आबाजी मात्र आपल्या मित्रांसोबत सामान्य खेळ न खेळता मुलांना आपल्या भोवताल बसवून भजन म्हणायचा, पोथी वाचायचा ! एका दिवशी तर बाल आबाजीने पोरा-बाळांना गोळा करून अक्षरशः कीर्तनच केले ! असां हा बालपणीचा काळ भुर्रकन उडून गेला आणि गावातील दुसरीपर्यंतची शाळा संपल्यावर आबाजींना पुढील शिक्षणासाठी मामाच्या गावी लोणीला जावे लागले. बालवयातील संस्कारांनी समृद्ध झालेले आबाजी हे अगदी कमी वयात समाजसुधारणेचा विचार करू लागले. मामाच्या गावी शिक्षण घेऊन दोन वर्षांनी आबाजी पुन्हा आपल्या गावी परतले. सावरगाव घाट परिसरातील डोंगरमाथ्यावर गाई सांभाळण्याचे सोपे काम आबाजीने स्वीकारले. सावरगावात गीतेबाबा दिघुळकर यांच्या दिंडी मुक्कामास गीतेबाबांचे सुंदर कीर्तन झाले आणि सकाळी आबाजी घरी कुणालाही न सांगता गीतेबाबांच्या दिंडीत पंढरपूरला निघून गेले. त्यानंतर एकावर एक महत्वपूर्ण घटना घडल्या. आबाजी पंढरपूर वारीवरून परतल्यानंतर मंदिरावरच थांबले. 'घरी सर्वजण जर माळकरी होत असतील तरच मी घरी येईन अशी आट घातली आणि मुलाच्या हट्टापायी पाटलांनी तुळसी माळ घालून मांसाहार वर्ज्य करण्याचे अभिवचन दिले. समाज सुधारणेची मुहूर्तमेढ घरीच रोवली आणि भक्ती-ज्ञान क्षेत्रांत एक क्रांतिकारी पाऊल टाकले ! आता मात्र आबाजींचे घरातील कोणत्याच कामात मन लागेनासे झाले, परिणामी त्यांनी नारायण गडावर माणिक बाबांच्या मार्गदर्शनात अभ्यास करायचे ठरवले. तिथे माणिक बाबांच्या सानिध्यात वारकरी, अध्यात्म आणि ज्ञानाचे संस्कार करून माणिक बाबांनी त्यांना आबाजी नाव बदलून भगवान हे नाव प्रदान केले.



तेंव्हापासून आबाजी भगवान बाबा म्हणून ओळखले जाऊ लागेल. त्यानंतर गावोगावी लोक बाबांना कीर्तनांसाठी बोलावू लागले. बलदंड देहयष्टी, नैष्टिक ब्रह्मचर्य, खडा आवाज, सुमधुर गायन आणि सखोल ज्ञान भगवान बाबांच्या कीर्तनातून पाझरू लागले ! पाहता पाहता बाबा परिसरात प्रसिद्ध झाले. याचा उलट परिणाम झाला. बाबांचे हितशत्रू वाढले आणि बाबांवर परस्त्रीचा आळ आणला गेला ! ही बातमी बाबांना समजताच बाबांनी नारायण गडाच्या पायथ्यासी धारदार विळ्याने स्वतःचे लिंग कापून टाकले. पायथ्यासी बाबा बेहोश पाहून काही शिष्यांनी त्यांना तात्काळ दवाखाण्यात उपचारार्थ दाखल केले. प्रकृती सुधारल्यानंतर बाबांनी नारायण गड सोडायचा निर्णय घेतला आणि ते धुम्यागडावर म्हणजेच आताच्या भगवानगडावर येऊन आपले कार्य सुरु केले. भगवानबाबांनी नैष्टिक ब्रह्मचर्य स्वीकारून कीर्तन-प्रवचनाच्या माध्यमातून समाजोत्थान आणि प्रबोधनाचे वृत्त धारण केले होते. बाबा गावोगाव जाऊन गोर-गरीब-वंचित-उपेक्षित-अज्ञानी लोकांचे प्रबोधन करू लागले. उच्च-नीचता संपवा, जातीभेद थांबवा, सर्व प्राणीमात्रांवर प्रेम करा असा उपदेश करत. अनेक कृतीशिल कार्यक्रमातून त्यांनी समाजसुधारणा कार्याची चुणूक समाजाला दाखवून दिली. बाबांची आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची हैद्राबाद येथे भेट झाली होती. त्या भेटीत डॉ.आंबेडकरांनी बाबांसोबत डोंगरदऱ्यांतील लोकांमध्ये शिक्षण प्रसाराचे कार्य करण्याची आवश्यकता बोलून दाखवली. बाबांनाही शिक्षणाचे महत्व ठाऊक असल्याकारणाने पंचक्रोशीतील लोकांकडून वर्गणी, धान्य गोळा करून, डोक्यावर दगड जमा करून धौम्य गडाच्या पायथ्यासी शाळा बांधली. परिसरातील गोर-गरीब, कामगारांच्या मुलांना मोफत शिक्षण देणे सुरु केले. महात्मा फुले, डॉ. आंबेडकर आणि संतांच्या उपदेशाची जाण बाबांना असल्यामुळे ते कीर्तनातून "एक एक्कर जमिन विका पण मुले शिकवा" असा उपदेश करायचे. याशिवाय अनेक गावातील कालबाह्य झालेल्या रूढी परंपरांच्या विरोधात कृतीशील कार्य केले. डोंगर-दऱ्यातील समाज दारू, तंबाखू, बांधावरून भांडणे यापासून दूर कसा राहील (?) यासाठी बाबा कीर्तनातून उपदेश करायचे. बाबांनी भगवानगड आणि पंचक्रोशीत गावोगाव नारळी साप्ताह सुरु केले. 'जेथे करावे कीर्तन | तेथे सेवू नये अन्न ॥' या तुकोक्तीप्रमाणे ते फक्त नारळ घेऊन लोकांना निर्व्यसनी रहा, आई-वडिलांची सेवा करा, शिक्षण शिका असा सरळ साधा उपदेश करायचे. बाबांनी परिसरातील अनेक गावच्या जत्रेतील गोहत्या, प्राणीहत्या सारख्या अमानुष रूढी परंपरा बंद केल्या. प्रसंगी बळी जाणाऱ्या गायीच्या गळ्याला चिकटून राहिले परंतु गोहत्या होऊ दिली नाही! आज श्री संत भगवान बाबांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने विचार करतांना अनेक गोष्टींचा उल्लेख होणे अपेक्षित आहे. समाज व्यसनाधीन होत असून जातिवाद वाढतो आहे.

धर्मसहिष्णुता ढासळत आहे. तेंव्हा, सर्वत्र कट्टरता सौम्य होऊन 'वसुधैव कुटुंबकम' भावना वृद्धिंगत होणे गरजेचे आहे. तसेच वर्तमानात कीर्तन-प्रवचन करणाऱ्या धुरिणांनी संत वचनांचा केवळ व्यापार न करता आपणही या समाजाचे काहीतरी देणे लागतो हे लक्षात ठेवावे! प्रबोधन करतांना केवळ विनोद आणि पैशावर लक्ष केंद्रित झाल्यामुळे लोक 'कीर्तन केवळ धंदा झाला आहे!' असे हिणवत आहेत.

हे कुठेतरी थांबून आपण सर्वांनीच समाजऋण फेडण्यासाठी आग्रही रहावे. असे झाल्यास कृतीशील समाजसुधारक संत श्री भगवान बाबांचे आपण पायिक म्हणवून घेण्याच्या योग्यतेचे होऊ, अन्यथा सर्व केवळ देखावाच ! रामकृष्णहरी ! जय भगवान बाबा !

**(टीप: लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

## भारतीय विज्ञान काँग्रेसमध्ये अवैज्ञानिक विचारांची मांडणी कशासाठी? अतुल लोंढे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सुरू असलेल्या भारतीय विज्ञान काँग्रेसमध्ये इंडियन वुमेन्स काँग्रेसच्या चर्चासत्रात अवैज्ञानिक व श्रद्धेला खतपाणी घालणारी मांडणी दोन महिलांनी केली. कांचन गडकरी यांनी हळदी कुंकवाचे महत्व सांगितले तर भाजपा नेत्या कल्पना पांडे यांनी घराबाहेर रांगोळी काढल्याने दुष्टशक्ती येत नाहीत असे सांगितले. रांगोळीने जर दुष्टशक्ती येत नसतील तर कांचन गडकरी व कल्पना पांडे यांना चीन, पाकिस्तानच्या सीमेवर पाठवून द्या व तिथे रांगोळ्या काढा, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते लोंढे यांनी म्हटले आहे. यासंदर्भात बोलताना लोंढे म्हणाले की, वैज्ञानिक व तंत्रवैज्ञानिक प्रगतीमुळे माणसांच्या जीवनात खूप सकारात्मक बदल झाले आहेत. आरोग्य, सुरक्षा, कृषी, उर्जा विभागासह अनेक क्षेत्रात मोठी प्रगती केलेली आहे. नागपूर विद्यापिठात सुरु असलेल्या इंडियन सायन्स काँग्रेसमध्ये सामाजिक कार्यकर्त्या कांचन गडकरी यांनी हळदी कुंकवाचे महत्व सांगणे व संयोजिका कल्पना पांडे यांनी घराबाहेर रांगोळी काढल्याने घरात दुष्टशक्ती येत नाहीत असा सल्ला देणे अयोग्य आहे, हा श्रद्धेचा भाग असू शकतो त्याचे विज्ञानामध्ये काय काम? यावर वैज्ञानिक महिलांनी आक्षेप घेतला हे योग्यच झाले आणि काँग्रेस पक्षही अशा प्रकारच्या विचारसरणीचा निषेध करतो. विज्ञानाच्या आधारे महिलांचे सक्षमिकरण यासंदर्भात मांडणी करणे गरजेचे असताना अशा प्रकारे अवैज्ञानिक विचार मांडून मुळ कार्यक्रर्माच्या उद्देशाला गडकरी व पांडे या दोन महिलांनी हरताळ फासला आहे. याचा फायदा होत असेल तर आपल्याला राफेल, अत्याधुनिक शस्त्रांची गरजच काय? डीआरडीओची गरज काय? सायन्स काँग्रेसची गरज काय? असे सवाल उपस्थित करत ही विचारसरणी देशाला अधोगतीकडे घेऊन जाणारी आहे, असेही लोंढे म्हणाले.

## कुत्रा चावल्याने तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यात सध्या कुत्र्यांनी थैमान घातला रेबीज आजाराने कुत्र्यांची ही अवस्था झाली आहे या प्रकारावर महापालिकेत महासभेत कुत्र्यांच्या निर्जीवीकरणासाठी ठराव देखील मंजूर झाला आहे परंतु कुठलेही प्रकारची त्याबाबत हालचाल दिसून येत नाही.

पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतलेल्या युवकाचा मृत्यू झाला असल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ग्यारसीलाल ताराचंद पावरा (वय २४) असे मृताचे नाव असून, तो हिंगोणीपाडा ता. शिरपूर येथील रहिवासी आहे. त्याच गावात झालेल्या या घटनेत सुशील सखाराम पावरा (वय १०) या बालकाची प्रकृतीही गंभीर असून, त्याला देखील धुळे येथे शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ग्यारसीलाल व सुशील या दोघांनाही काही दिवसांपूर्वी गावातील एका पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतला होता.

त्यानंतर दोघांना धुळे येथे नेऊन शासकीय रुग्णालयातून अँटिरेबीज लस देण्यात आली होती त्यानंतर ते दोघी उपचार घेऊन ते गावी परतले. मात्र त्यांच्या नातलगांच्या म्हणण्यानुसार, उपचार घेतल्यानंतरही ग्यारसीलालची ताब्यात बरी होऊ शकली नाही. त्यानंतर त्याला दोन ते तीन दिवसांपासून त्याला झटके येणे, बेशुद्ध पडणे अशी लक्षणे जाणवू लागली. त्यानंतर त्याची अवस्था गंभीर झाल्याने त्याच्या नातेवाईकांनी शिरपूरला रुग्णालयात दाखल करण्याकरीता निघाले मात्र त्याचा रस्त्यातच मृत्यू झाला.



## स्वर प्रथमच्या वेलकम 23 संगीत सोहळ्याचा औरंगाबादकरांनी लुटला संगीतानंद

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** रसिकांच्या उस्फूर्त प्रतिसादानी भरगच्च भरलेले नाट्यगृह, गाण्यागणिक वंसमोर, शिट्या आणि टाळ्यांची बरसात, आबालवृद्धांचा अफलातून प्रतिसाद आणि गायक वादकाच्या अफलातून गाण्याच्या सादरीकरणामुळे स्वर प्रथम प्रस्तुत वेलकम 23 मराठी हिंदी गीतांची श्रवणीय मैफल औरंगाबादकरांच्या कायम स्मरणात राहील, अशी झाली. नववर्षाच्या प्रथम दिनी सायंकाळी सुरू झालेली ही स्वर मैफल रसिकांना देखील गायला लावत होती. तत्पूर्वी संगीत मैफलचे दीप प्रज्वलन औरंगाबादच्या उपजिल्हाधिकारी श्रीमती अंजलीताई धानोरकर, प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध संगीतकार व गायक अतुल दिवे, गायिका वैशालीताई कुर्तडीकर, गिटारिस्ट श्रीराज कुलकर्णी यांच्या शुभ हस्ते झाले. याच मैफलमध्ये गिटारिस्ट श्रीराज कुलकर्णी आणि गुरुजी अतुल दिवे यांचा मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मान केला. गायक दीपक पवार यांच्या नव्या मॅशप मध्ये रसिकही गाऊन निघाले. श्रुती कुलकर्णी आणि नंदिनी महाजन यांच्या कजरा मोहोबत वाला गीताला वंसमोअर, प्रथमेश महाजन कुछ ना कहो... वंसमोअर श्री सुहास महाजन यांच्या निवेदनाने मजा आणली तर आज नाना पाटेकर यांच्या जन्मदिवसा निमित्त शुभेच्छा देऊन वजुद मधील कैसे बताऊ मै तुम्हे...हा संवाद देखील त्यांनी सादर केला. कु आकांक्षा पिंपळे हिने वेलकम 23 ची सुरेख रांगोळी रेखाटली. ध्वनी ऋषीकेश धर्माधिकारी, छायाचित्रन सौरव सावळे यांनी जीमेदरी पार पाडली. तर प्रसाद साडेकर, गजानन केचे, सुभाष पळसकर, श्रीपाद पदे, वैभव पांडे, वर्षा जोशी, कृष्णा कुलकर्णी, ज्ञानेश्वर कुलकर्णी, प्रसाद कुलकर्णी, धनंजय बोटवे,सचिन कुलकर्णी, सुशांत बडे,शैलजा मुन्शी, उमेश जोशी, डॉ. आरतीशामल जोशी, डॉ प्रफुल पिंपळे यांची उपस्थिती होती. अमोघ के-हालकर, हर्षवर्धन हेलवाडे, खुशी, मंजिरी,प्रणव कुलकर्णी,समर्थ जोशी आदींनी परिश्रम घेतले. वर्षाच्या पहिल्या दिवशीच संगीत, संवाद मैफलित रसिक तृप्त झाले.

